रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १८ ◆ अंक २६९
www.ramprahar.com

◆ शनिवार, १८ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

आपट्याजवळ तरुणाचा टेम्पोने फरफटत नेल्याने मृत्यू/ २
श्रीवर्धन शहरात चोर आल्याच्या अफवा/ ५
टी-२० वर्ल्डकपच्या सामन्यात झाली फिक्सिंग?/ ८

## राज्यातील 'अवकाळी'ग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत मंजूर



**मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीसह पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. एकूण ६६ हजार ३१२ शेतकरी या अवकाळी संकटामुळे बाधित झाले असून बळीराजाला दिलासा देण्यासाठी ५३ कोटी ७३ लाख सात हजार रुपयांची मदत मंजूर केल्याची माहिती मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. राज्यातील विविध विभागांतील सुमारे ४९ हजार ५११.७२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांना जाहीर केलेली मदत त्वरित मिळावी यासाठी प्रशासकीय यंत्रणेला पंचनामे जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मदत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता व वेग राखण्यावर शासनाचा विशेष भर असून जिल्हाधिकाऱ्यांनी परिस्थितीचा सतत आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

# महिलांच्या प्रगतीमध्ये विरोधकांचा खोडा

## नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयक लोकसभेत नामंजूर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिलांना ३३ टक्के आरक्षण देऊ करणारे नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयक शुक्रवारी (दि.१७) विरोधकांच्या विरोधामुळे लोकसभेत नामंजूर झाले. यावेळी एकूण ५२८ जणांनी मतदान केले. त्यापैकी २९८ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने, तर २३० जणांनी विधेयकाच्या विरोधात मतदान केले.



२०२९पर्यंत संसदेत महिलांना आरक्षण देण्यासाठी सरकारने तीन विधेयके सादर केली होती. यात नारी शक्ती वंदन अधिनियम २०२३मध्ये सुधारणा करण्यासाठी संविधान (१३१वी दुरुस्ती) विधेयक, संसदीय मतदारसंघांची पुनर्रचना करण्यासाठी सीमांकन विधेयक आणि केंद्रशासित प्रदेशांनाही कोटा लागू करण्यासाठी तिसऱ्या विधेयकांचा समावेश होता.

महिला विधेयकावर संसदेत गुरुवारी जोरदार चर्चा झाल्यानंतर शुक्रवारी रात्री मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी एकूण ५२८ जणांनी मतदान केले. यात विधेयकाच्या बाजूने २९८ आणि विरोधात २३० मते पडली. घटनादुरूस्तीशी संबंधित विधेयकांना मंजूर होण्यासाठी दोन-तृतीयांश बहुमताची आवश्यकता असते, पण विरोधात जास्त मतदान झाल्याने हे विधेयक नामंजूर झाल्याचे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी जाहीर केले. यानंतर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी, इतर सरकारने दोन विधेयके पुढे न नेण्याचा निर्णय घेतला आहे, परंतु महिला सक्षमीकरण सुरूच राहिल, असे स्पष्ट केले.

मोदी सरकारने महिला आरक्षणाद्वारे लोकसभेच्या जागा वाढवण्याचे प्रस्तावित केले होते. २०२९च्या निवडणुकीत सध्याच्या ५४३ जागांमध्ये वाढ करून राज्यांतील लोकसभेच्या जागा ८१५ आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागा ३५ जागा मिळून ८५० जागा करण्याचा प्रस्ताव विधेयकात होता. यात महिलांसाठी विधानसभेतही ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली होती, मात्र विरोधकांनी सीमांकन विधेयकाची ढाल करून महिला आरक्षण विधेयकाला विरोध दर्शविला. त्यामुळे सत्ताधारी खासदारांनी विरोधक महिलाविरोधी असल्याच्या घोषणा संसद सभागृहाबाहेर देत निषेध केला.

# न्हावाशेवा पाणीपुरवठा टप्पा-३ वेळेत पूर्ण करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रशासनाला निर्देश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेत शुक्रवारी (दि. १७) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत न्हावाशेवा पाणीपुरवठा योजना टप्पा-३संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा सक्षम करणे अत्यावश्यक असल्याने ही योजना प्राधान्याने आणि वेळेत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीस महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे, कार्यकारी अभियंता वेंगुर्लेकर, उपअभियंता रमेश वायदंडे, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक प्रवीण पाटील, अजय बहिरा, सुमित झुंजारराव, नगरसेविका रूचिता लोंढे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रशासनासोबत न्हावाशेवा टप्पा-३ पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सुरू असलेल्या या योजनेचे काम तांत्रिक अडचणींमुळे लांबणीवर पडले आहे. एप्रिल किंवा जूनअखेरपर्यंत पूर्ण होणारी ही योजना आता जुलैअखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पाइपलाइन टाकताना काही ठिकाणी जागा मालकांशी असलेले वाद तसेच तांत्रिक अडथळे ही प्रमुख कारणे असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर नगरसेवकांवर जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले असून पाइपलाइन टाकण्याच्या कामात येणाऱ्या अडचणी तत्काळ सोडविण्यावर भर देण्यात येत आहे. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नगरसेवकांना आपल्या प्रभागातील नागरिकांशी थेट संवाद साधण्याचे आवाहन केले. पाइपलाइन टाकताना स्थानिक पातळीवर निर्माण होणाऱ्या अडचणी, गैरसमज किंवा अडथळे दूर करण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

# कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे सीबीएसई दहावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकत्याच जाहीर केलेल्या दहावीच्या निकालात रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी गुणवत्तेच्या जोरावर शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

याबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या परीक्षेत जान्हवी संतोष धापते हिने ९७.२० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला. त्यापाठोपाठ स्वरा अजय देशमुख ९६.६० टक्के गुणांसह द्वितीय, तर इशांत संदीप ढोकळे ९५.२० टक्के गुण मिळवून तृतीय स्थानी राहिला.

याशिवाय विद्यालयात चतुर्थ क्रमांकावर ९४ टक्के गुणांसह अथर्व सचिन माने आणि खुशी श्रीराम झुंजुर्के यांनी संयुक्तपणे बाजी मारली, तर ९१.६० टक्के गुण मिळवून प्रीतम समर्जित प्रजापती याने पाचवा क्रमांक मिळविला आहे. (पान २ वर..)

## 'त्या' शाळांची मान्यता होणार रद्द

**मुंबई :** राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या आणि सर्व मंडळांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषेचे अध्यापन सक्तीचे असतानाही या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या शाळांविरुद्ध महाराष्ट्र सरकारने आता कठोर पाऊल उचलले आहे. मराठीचा विषय अनिवार्य न करणाऱ्या शाळांना दंड करून न थांबता त्यांची मान्यता किंवा ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे.

काही खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये कायद्याची पायमल्ली होत असल्याचे सरकारच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे दंडात्मक कारवाईची आणि मान्यता काढण्याची विस्तृत कार्यपद्धती जाहीर केली आहे.

## निवडक

### होर्मुझची सामुद्रधुनी तुर्त सर्वांसाठी खुली

**तेहराण :** इस्रायल-लेबनॉन युद्धबंदीच्या पार्श्वभूमीवर इराणने जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला होर्मुझची सामुद्रधुनी हा सागरी मार्ग वाहतुकीसाठी खुला ठेवण्याची घोषणा केली आहे. इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी स्पष्ट केले की, या काळात सर्व व्यापारी जहाजांना विनाअडथळा आणि सुरक्षित प्रवासाची परवानगी दिली जाईल. ही परवानगी युद्धबंदी संपण्यापर्यंतच असणार आहे.

### कार-बसच्या धडकेत सहा जणांचा होरपळून मृत्यू

**बंगळुरू :** कर्नाटकच्या यादगीर जिल्ह्यात सुरपूर तालुक्यातील शांतगिरी क्रॉस येथे भरधाव कार धडकून खासगी आराम बस पेटली. त्यामुळे लागलेल्या आगीत सहा प्रवासी होरपळून मृत्युमुखी पडले. या दुर्घटनेत अनेक प्रवासी जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले.

# दुहेरी नागरिकत्वप्रकरणी राहुल गांधींच्या अडचणीत वाढ

## एफआयआर नोंदवण्याचे हायकोर्टाचे आदेश



**लखनऊ : वृत्तसंस्था**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या दुहेरी नागरिकत्वाच्या मुद्द्यावरून आता एक मोठे कायदेशीर वळण समोर आले आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठाने या प्रकरणी राहुल गांधी यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत.

राहुल गांधी यांच्याकडे भारतासोबतच ब्रिटनचेही नागरिकत्व असल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. भारतीय संविधानानुसार कोणत्याही व्यक्तीला दुहेरी नागरिकत्व ठेवता येत नाही. जर एखादी व्यक्ती दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारत असेल, तर तिचे भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात येते. अशा परिस्थितीत ती व्यक्ती भारतात निवडणूक लढवण्यास किंवा संसदेचे सदस्य होण्यास अपात्र ठरते.

राहुल गांधी यांच्या नागरिकतेबाबत वाद खूप जुना आहे आणि वारंवार कायदेशीर आणि राजकीय वर्तुळात हा चर्चेचा विषय बनत आलेला आहे. या वादाचे मूळ ब्रिटनमधील बॅकोप्स लिमिटेड कंपनी आहे. ही कंपनी लंडन येथे नोंदणी करण्यात आलेली होती. राहुल गांधी या कंपनीचे डायरेक्टर आणि सचिव होते. त्यांनी २०२४ची लोकसभा निवडणूक रायबरेली मतदारसंघातून जिंकली आहे. त्यामुळे या आरोपाचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ अभंगांचे आज लोकार्पण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नादब्रह्म साधना मंडळाच्या वतीने निर्मिती करण्यात आलेल्या प्रचलित रागांवर आधारित ७५ अभंगांचे लोकार्पण शनिवारी (दि. १८) सायंकाळी ५ वाजता पनवेल येथे होणार आहे.

मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणाऱ्या या लोकार्पण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व नगरसेवक परेश ठाकूर, पं. निवृत्तीबुवा चौधरी, नादब्रह्म साधना मंडळाचे अध्यक्ष वसंत पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

या अभंगांची रचना व सादरीकरण विविध अनवट आणि पारंपरिक रागांवर आधारित चालींमध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे नवोदित विद्यार्थी, शिष्यवर्ग आणि संगीत अभ्यासकांना रागांची शास्त्रशुद्ध व सुसूत्र ओळख होण्यास मोठी मदत होणार आहे. या उपक्रमाने अमृत महोत्सव वर्षाला आणखी एक सांस्कृतिक व आध्यात्मिक अधोरेखा लाभली आहे.

## पनवेल मनपातर्फे उद्या खारघर हिल महापौर मॅरेथॉन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने खारघर सेंट्रल पार्क येथे भव्य खारघर हिल महापौर मॅरेथॉन (प्रोमो रन)चे आयोजन शनिवारी (दि.१८) करण्यात होते, परंतु शनिवार हा कामकाजाचा दिवस असल्याने अनेक नागरिकांनी केलेल्या विनंतीनुसार आणि योग्य वाहतूक नियोजनासाठी ही मॅरेथॉन आता रविवारी (दि. १९) होणार आहे.

नागरिकांमध्ये आरोग्याप्रति जागरूकता निर्माण व्हावी आणि शहरात क्रीडा संस्कृती वाढावी या उद्देशाने मॅरेथॉन घेण्यात येत आहे, जी १० आणि पाच किमी अशा दोन गटांमध्ये होणार आहे. या माध्यमातून फिटनेसप्रेमींना एकत्र आणण्याचा मानस आहे.

निसर्गरम्य वातावरणामुळे ही मॅरेथॉन धावपटूंसाठी एक वेगळा अनुभव देणारी ठरणार आहे. यात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.



# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून ८६९ रुग्णांना ८.१० कोटींची मदत

**मुंबई : प्रतिनिधी**

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात आर्थिक वर्षात ८६९ रुग्णांना सुमारे ८ कोटी १० लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राऊड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दात्यांचे सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदत**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत मुंबई उपनगर जिल्ह्यातील ८६९ रुग्णांना सुमारे ०८ कोटी १० लाख ४४ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

**मदत कक्षातर्फे आवाहन**

गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता आणि अधिक माहितीकरिता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# मयत व्यक्तीच्या कुटुंबियांना अतिरिक्त लाभ देण्यास ठाणे एमएसीटीचा नकार

**ठाणे : प्रतिनिधी**

क्रेन अपघातात मृत्यू झालेल्या डॉक कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा अपघात मोबदला मागणी दावा मोटार अपघात ट्रिब्यूनल ठाणे यांनी फेटाळला ठाणे जिल्हा न्यायालयामध्ये सुरू असलेला मोटार अपघात मोबदला मागणी खटला मा. न्यायाधीश श्री के.पी.श्रीखंडे यांनी फेटाळून लावला.

क्रेन अपघातात मृत्यू झालेल्या डॉक कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा अपघात मोबदला मागणी दावा मोटार अपघात ट्रिब्यूनल ठाणे यांनी फेटाळला ठाणे जिल्हा न्यायालयामध्ये सुरू असलेला मोटार अपघात मोबदला मागणी खटला मा. न्यायाधीश के.पी.श्रीखंडे यांनी फेटाळून लावला. द्रोणगिरीमध्ये घडलेल्या एका मोटार अपघातात मृत्यू झालेल्या ३२ वर्षीय डॉक कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांनी मोटार अपघात ट्रिब्यूनल ठाणे येथे लाभासाठी दावा दाखल केला होता. या प्रकरणात कुटुंबीयांनी रु. ५० लाख अपघात मोबदला मिळावा यासाठी अर्ज केला होता.

या अर्जामध्ये त्यांनी विषयांकित अपघात हा मशीन चालकाच्या बेदरकार चालवल्यामुळे झाला होता असे नमूद केले होते. मात्र, एमएसीटी कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार, संबंधित अपघात ग्रस्तांने सुरक्षा साधनांचा वापर न करता प्रतिबंधित खाजगी क्षेत्रात प्रवेश केला होता. प्राधिकरणाच्या चौकशीत असे स्पष्ट झाले की, संबंधित कर्मचाऱ्याला पूर्वीच सुरक्षा नियमांची माहिती होती तरीदेखील त्याने नियमांचे पालन न केल्यामुळे हा अपघात घडल्याचे अहवालात नमूद आहे. सदरील मशीन वर तिच्यापासून दहा मीटर दूर राहावे अशी सूचना छापलेली असते त्याकडे अपघात ग्रस्त व्यक्तीने दुर्लक्ष करून सदरील मशीन सुरू असताना तिच्या निर्धारित मार्गिका मध्ये त्यांनी प्रवेश केलेत्यामुळे हा अपघात झाला तसेच मशीन मालकाच्या कंपनीच्या वतीने मयत व्यक्तीच्या कुटुंबीयांना तातडीने रु. ३१ लाखाची मदत अपघातानंतर लगेच देण्यात आली होत.

या सर्व बाबींचा विचार करता या मोटार वाहन कायद्यान्वये मयत व्यक्तीच्या वारसाना अतिरिक्त लाभ देण्यास नकार देण्यात आला आहे. या खटल्याकामी विनायक कोळी, सुमंत तावडे, प्रदीप नायर आणि श्रीमती नावडकर यांनी काम पाहिले

# आपटा गावाजवळ तरुणाचा टेम्पोने फरफटत नेल्याने मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीमधील आपटा गावाजवळील दांड-आपटा रोडवरील वळणावर एका १९ वर्षीय तरूणाचा टेम्पोने फरफटत नेल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली.

रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आपटा गावाच्या हद्दीतील वळणावर अजय संतोष कातकरी (रा. डाऊरनगर, कातकरवाडी-उरण) हा व त्याचा नातेवाईक राजेश लक्ष्मण कातकरी (वय २१) हे दोघे फिर्यादी मित्र राजेश लक्ष्मण कातकरी याच्या मालकीच्या स्पेंडर मोटारसायकलवरून रसायनी येथे नातेवाईकांच्या हळदी कार्यक्रमाला जात असताना आपटा ते दांडफाटा रोडवर आपटा गावाच्या हद्दीत वळणाच्या रस्त्यावर मोटारसायकल स्पिल होऊन दोघे रस्त्याखाली पडल्याने या अपघातात राजेश लक्ष्मण कातकरी याला डोक्याला व हातापायाला खरचटले असून मुका मार लागला असून त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

त्याच्यासोबत असलेला नातेवाईक मयत अजय संतोष कातकरी रस्त्यावर पडलेला असताना त्याचवेळी रस्त्यावरून जाणाऱ्या एका अनोळखी टेम्पोच्या खालील बाजूस अजय संतोष कातकरी याचे कपडे अडकल्याने त्यास या टेम्पो चालकाने तसेच फरफटत तीन किलोमीटर नेल्याने मयत अजय कातकरी यास गंभीर स्वरूपाची दुखापत होऊन मयत झाला.

आरोपी अनोळखी टेम्पो चालकाचा पोलीस तपास करीत असून मोटार वाहन कायदा कलम १३४(अ), १३४(ब), १८४ नुसार नोंद करण्यात आली आहे. रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार सपोनि प्रमोद जाधव अधिक तपास करीत आहेत.

# निर्माणाधीन ऐरोली नाट्यगृहाला आग; साहित्य जळून खाक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून ऐरोली सेक्टर-५ येथे नाट्यगृह साकारत आहे. मागील १४ वर्षापासून रखडलेले नाट्यगृहाचे काम अंतिम टप्प्यात आलेले असताना शुक्रवार १७ एप्रिल रोजी आगीच्या विळख्यात अडकल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. पालिकेतील विरोधी पक्षाचे गटनेते मनोज हळदणकर यांनी या आगीच्या घटनेची चौकशी करण्याची मागणी केली आहे. तर दुसरीकडे आयुक्तांनी शॉर्ट सर्किट अथवा वेल्डिंग कामामुळे ही आग लागली असावी, अशी शक्यता व्यक्त केली आहे.



पालिकेच्या माध्यमातून ऐरोली सेक्टर ५ येथील भूखंड क्रमांक ३७ येथे नाट्यगृहाची तळमजल्यासह चार मजली वस्तू उभारण्याचे काम सुरू आहे. माजी आमदार संदीप नाईक यांच्या काळात या नाट्यगृहाच्या कामाची महूर्तमेढ रोवण्यात आली, मात्र त्यानंतर १० वर्ष काम रखडले होते. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी नगरविकास मंत्री असताना रखडलेल्या कामाला गती दिली. मागील चार ते पाच वर्षापासून या नाट्यगृहाच्या कामाने गती घेतली आहे.

नाट्यगृहाची वस्तू पुर्णपणे साकारत असताना शुक्रवार १७ एप्रिल रोजी या वास्तूच्या तळ मजल्याला दुपारी १ वाजण्याच्या सुमारास आग लागली. या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसली तरी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.

याबाबतची माहिती महासभा सुरू असताना सदस्यांनी दिली. या आगीच्या घटनेचा अहवाल पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सभागृहापुढे सादर केला. यात घटकराज्य तळमजलेला लागलेल्या आगीने रौद्ररूप धारण केल्याने चौथ्या मजल्यावर ही आग पोहचली. घटनेची माहिती मिळताच ऐरोली आणि कोपरखैरणे येथील अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी तालुक्यात आगेवर दोन तासात शर्तीचे प्रयत्न करून नियंत्रण मिळवले. त्याचप्रमाणे या आगीत लागलेल्या शंभर कामगार आणि इमारतीच्या टेरेसवर अडकलेल्या दोन कामगारांना सुखरूपपणे बाहेर काढले. ही आग येथे वेल्डिंगचे काम सुरू असल्याने शॉर्ट सर्किट झाल्यामुळे लागल्याचे आयुक्त डॉ.शिंदे यांनी सभागृहाला माहिती देताना सांगितले. या आगीत लाकडी साहित्य, थर्माकोल फोम, सीसीटीव्ही आदी साहित्य जळून खाक झाल्याची माहिती दिली.

दरम्यान, पालिकेचे विरोधी पक्ष गटनेते मनोज हळदणकर यांनी या आगीवरून संशय व्यक्त केला आहे. शहरातील नाट्यप्रेमींसाठी एवढी मोठी वास्तव बांधण्याचे काम अनेक वर्षांपासून रखडले होते आता कुठे या कामाला कधी आल्यानंतर ही आग लागल्याने त्यांनी संशय व्यक्त करीत चौकशी करण्याची मागणी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

## निवडक

### बीपीसीएल कंपनीतून केबलची चोरी

**मोहोपाडा :** रसायनीतील बीपीसीएल कंपनीतून अज्ञात चोरट्याने ११ लाख २८ हजार ३६० रूपये किंमतीची दोन कॉपर केबलची बंडल चोरून नेल्याची घटना घडली असून भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीचे बॉट प्लॉटमधून अज्ञात चोरट्यांनी स्वतःच्या फायद्याकरिता लबाडीच्या इराद्याने व कंपनीच्या मालकाच्या संमतीशिवाय ११ लाख २८ हजार ३६० रूपये किंमतीची दोन बंडल अंदाजे लांबी २ हजार मिटर चोरून नेली असून अज्ञात चोरट्यांचा तपास रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि मंगेश बाचकर अधिक तपास करीत आहेत.

### नेरूळमध्ये आज सन्मान कार्यक्रम

**नवी मुंबई :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) कपिलवस्तु बुध्द विहार सेवा समिती, नेरूळ यांच्या विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५ वा जयंती महोत्सव शनिवारी १८ एप्रिल रोजी कपिलवस्तू बुध्दविहार, सेक्टर १०, नेरुळ, येथे आर पी आय (आठवले गट) नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष महेश खरे यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबई महापौर सुजाता पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यावेळी जाहीर सभा संपन्न होणार असून यावेळी पँथर आणि आंबेडकरी चळवळीत मोलाचे योगदान दिलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार असल्याचे निमंत्रक एल आर गायकवाड यांनी कळविले आहे.

# कोपरखैरणेमध्ये उद्या हिंदू संमेलन

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे सेक्टर ११-१२, बनकोडे परिसरात हिंदू संमेलन आयोजन समितीची नियोजन बैठक झाली. या बैठकीत रविवार, १९ एप्रिल २०२६ (अक्षय तृतीया) रोजी भव्य हिंदू संमेलन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच संमेलनासाठी कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. यामध्ये प्रसिद्ध रांगोळीकार व चित्रकार श्रीहरी पवळे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

मातृशक्ती उपाध्यक्षपदी नयना शेट्टी, युवाशक्ती उपाध्यक्षपदी प्रकाश थोरात व अजित चोरगे, सचिवपदी सुनील पाटील, कोषाध्यक्षपदी प्रमोद जांभळे व भालजी चंद्रा यांची निवड झाली आहे. सांस्कृतिक प्रमुख म्हणून अंबादास कोटा, तर प्रसार व परवानगी प्रमुख म्हणून कल्याणी साळुंखे व अतुल देशमुख यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

रविवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ८ दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सायंकाळी ४ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. सायं. ६ ते ७.३० दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम, तर ७.३० ते ८ वाजेपर्यंत उपस्थित वयांचे मार्गदर्शन होणार आहे. या संमेलनास प्रमुख वक्ते म्हणून सौरभ सिन्हा उपस्थित राहणार असून प्रमुख अतिथी सद्गुरु दिगंबरानंद सरस्वती स्वामी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यानंतर भजन संध्या व प्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे.

या भव्य हिंदू संमेलनात शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून परिसरातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नवीन पनवेलमध्ये डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तसेच धम्मदीप बुद्ध विहार आणि माता रमाई महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नवीन पनवेलमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार, १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सामुदायिक वंदना, प्रवचन, अल्पोपहार, डॉ. आंबेडकर व छत्रपती शिवरायांची भव्य मिरवणूक इत्यादी कार्यक्रम होणार आहे. तर रविवार, १९ एप्रिल २०२६ रोजी महिलांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, संगीत खुर्ची, लहान मुलांचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे.


या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील यांची उपस्थिती लाभेल तर महापालिका नगरसेवक, नगरसेविका यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. तसेच खांदा कॉलनीतील संयुक्त जयंती उत्सव समिती व आर.पी.आय महिला मंडळाची विशेष उपस्थिती असेल.

कार्यक्रमासाठी स्थानिक पदाधिकारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आरपीआयचे दिनेश जाधव आणि अंकुश साळवे यांनी केले आहे.

# कर्जतच्या श्री धापया महाराजांचा उद्या उत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराज यांचा रविवारी अक्षय तृतीयेला उत्सव असून सोमवारी येथील आखाड्यात कुस्त्या रंगणार आहेत. कर्जत मधील सर्व धर्मीय बांधव - भगिनी श्री धापया महाराज्यांच्या दर्शनासाठी आवर्जून येत असतो.



रविवारी १९ एप्रिल रोजी पहाटे सनई वादनाने उत्सवाची सुरुवात होणार असून त्यानंतर लघुरुद्र होणार आहे. सकाळी आठ वाजता अक्षय वर्धावे यांचा शात्रिय गायनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. संध्याकाळी पाच वाजता श्री धापया महाराजांचा शहरातून पालखी सोहळा होणार आहे. त्यानंतर भजनी कलावंतांचे चक्री भजन आयोजित केले आहे.

सोमवारी २० एप्रिल रोजी कुस्त्यांचे जंगी सामने होणार आहेत. ही परंपरा शंभर वर्षाहून अधिक आहे. राज्य नव्हे तर देश भरातील पहिलवान या आखड्यात येत असतात. यंदा शेवटची मोठ्या रकमेची कुस्ती कर्जतचे प्रथम नगराध्यक्ष स्व. रमेश चंदन यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र प्रसाद चंदन यांनी प्रायोजित केली आहे.

पान १ वरुन

## कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे सीबीएसई दहावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश

विशेष म्हणजे या परीक्षेला बसलेल्या एकूण ३१ विद्यार्थ्यांपैकी सात विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक, तर १५ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून विशेष श्रेणीत यश संपादन केले आहे. मराठी विषयात तीन विद्यार्थिनींनी आणि डेटा सायन्स या तांत्रिक विषयात दोन विद्यार्थ्यांनी १००पैकी १०० गुण मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

या देदीप्यमान यशाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले, तर विद्यार्थ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी, संस्थेचे रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे आदी उपस्थित होते.

# रेवदंडा-चौल परिसराला प्री-वेडिंग फोटोग्राफिसाठी वाढती पसंती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा-चौल परिसर सध्या प्री-वेडिंग फोटोग्राफीसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र ठरत आहे. निसर्गसौंदर्य, ऐतिहासिक वारसा आणि शांत वातावरण यांचा सुंदर संगम लाभलेल्या या परिसराला छायाचित्रकार आणि नवदांपत्यांची मोठ्या प्रमाणावर पसंती मिळत आहे.

कुंडलिका खाडी आणि अरबी समुद्राच्या किनाऱ्याने नटलेला रेवदंडा बीच प्री-वेडिंग शूटसाठी विशेष लोकप्रिय झाला आहे. स्वच्छ, विस्तीर्ण समुद्रकिनारा, लाटांचा आवाज आणि सूर्यास्ताचे मोहक दृश्य या सर्व गोष्टींमुळे येथे दररोज अनेक फोटोशूट होताना दिसतात. यासोबतच रेवदंडा आगरकोट किल्ल्याची भव्य तटबंदी आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी छायाचित्रांना वेगळे आकर्षण देतात.

चौल परिसरातील प्राचीन मंदिरेही प्री-वेडिंग फोटोग्राफीसाठी महत्त्वाची ठिकाणे ठरत आहेत. रामेश्वर मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, शितळादेवी मंदिर परिसरातील हिरवाई, शांतता आणि पारंपरिक वास्तुकला यामुळे छायाचित्रांना एक वेगळाच भाव प्राप्त होतो. विशेषतः



सकाळच्या कोवळ्या उन्हात आणि सायंकाळच्या सौम्य प्रकाशात येथे फोटोशूटसाठी मोठी गर्दी पाहायला मिळते.

रायगडसह महाराष्ट्राच्या विविध भागांतून छायाचित्रकार आणि नवदांपत्ये येथे प्री-वेडिंग शूटसाठी येत आहेत. फोटोग्राफीसोबतच येथे पर्यटनाचा आनंदही घेता येत असल्यामुळे या ठिकाणाचे आकर्षण अधिकच वाढले आहे. चौलमधील बागायती परिसर, हिरवळ आणि स्वच्छ वातावरण भेट देणाऱ्यांना सुखद अनुभव देतात.

प्री-वेडिंग फोटोग्राफीच्या वाढत्या ट्रेंडमुळे रेवदंडा-चौल परिसरात आर्थिक उलाढालीला चालना मिळाली असून स्थानिक व्यवसायांनाही त्याचा मोठा फायदा होत आहे. निसर्ग, इतिहास आणि पर्यटन यांचा संगम असलेला हा परिसर आगामी काळातही प्री-वेडिंग फोटोग्राफीसाठी प्रमुख केंद्र म्हणून ओळखला जाईल, यात शंका नाही.

# निवडणूक, संजय गांधी निराधार योजना, अर्जांची जबाबदारी तहसील कार्यालयाची

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये पनवेल तहसील कार्यालय आणि अपर तहसील कार्यालय असे दोन कार्यालय आहेत. महसुली कामकाजाव्यतिरिक्त इतर कामकाजाबाबत निवडणूक, संजय गांधी निराधार योजना, अर्ज, निवेदने प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी मुख्य तहसील कार्यालयाची असणार आहे.

पनवेलमध्ये दोन तहसील कार्यालय असल्याने कामकाजाबाबत जबाबदारी नेमून देण्यात आली नव्हती. त्यामुळे आता शासनाने दोन्ही तहसील कार्यालयाची जबाबदारी निश्चित केली आहे. इतर कामकाज संपूर्ण तालुक्यासाठी हाताळण्याचा अधिकार हे मूळ तहसील कार्यालयास राहतील तसेच महसुली कामकाजाव्यतिरिक्त इतर कामकाज निवडणूक, संजय गांधी निराधार योजना व इतर अर्ज, निवेदने प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी मुख्य तहसीलदार कार्यालयाची (साईनगर, पनवेल) असणार आहे. पनवेलच्या अपर तहसील कार्यालयासाठी सात पदांची नेमणूक करण्यात आली आहे. यात एक तहसीलदार, एक नायब तहसीलदार, एक सहाय्यक महसूल अधिकारी, तीन महसूल अधिकारी आणि एक वाहन चालक यांचा समावेश आहे.

तहसील कार्यालय, अपर तहसील कार्यालय तसेच इतर कार्यालयांच्या पातळीवर स्थायी आणि अस्थायी पदे कार्यरत आहेत. या पदांचा विचार करून सुधारित आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. तहसीलदार कार्यालयाचे कार्यक्षेत्र निश्चित करताना मंडळ हा घटक समजण्यात येऊन एकाच मंडळ कार्यालयाचे दोन तहसीलदार कार्यालयामध्ये विभाजन करू नये. संपूर्ण मंडळ कार्यालय एकाच कार्यालयाकडे राहील याची दक्षता घ्यावी.

## दुखवटा

### अमृता आंग्रे



**पनवेल :** शिळफाटा येथील अमृता अनिल आंग्रे यांचे मथुरा येथे ब्रेन स्ट्रोक या आजाराने वयाच्या ६२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर शिळफाटा, खोपोली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

शिळफाटा येथील समाजसेवक, श्रद्धा कॅटरर्सचे अनिल रामचंद्र आंग्रे यांच्या अमृता आंग्रे या पत्नी होत्या. शिळफाटा आणि खोपोली परिसरात त्यांचे समाजकार्य सर्वश्रुत आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, मुलगी, जावई, नात, नातू असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी १८ एप्रिल रोजी नाशिक येथे होणार असून उत्तरकार्य २१ एप्रिल रोजी राहत्या घरी श्री हनुमान मित्र मंडळ, शिळफाटा येथे होईल.

# अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेऊ नका!

## पनवेल महापालिकेचे पालकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्तत**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात शासनाची परवानगी न घेता सुरू असलेल्या प्राथमिक शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित पालकांना आपल्या पाल्यांचा प्रवेश अशा अनधिकृत शाळांमध्ये करू नये, असे आवाहन महापालिकेतर्फे आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार खालील शाळा अनधिकृत असून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. १.मार्शमेलोज इंटरनॅशनल स्कूल, ओवे, २.काळसेकर इंग्लिश मिडियम स्कूल, तळोजा पाचंद, ३.अर्कम इंग्लिश स्कूल, तळोजा, ४.ओशीन ब्राईट कॉन्व्हेंट स्कूल, तळोजा, ५.ऑक्सफर्ड इंग्लिश मिडियम स्कूल, कळंबोली, ६.बजाज इंटरनॅशनल स्कूल, तळोजा, ७.दि वेस्ट हिल हाय इंटरनॅशनल स्कूल, तळोजा शाळा सुरू होण्यापूर्वीच त्यांना अनधिकृत घोषित करण्यात आले असून, पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेश या शाळांमध्ये करू नयेत. पालकांना कळविण्यात येते की आपल्या पाल्यांचा प्रवेश घेत असताना सदरची शाळा अधिकृत असल्याची खात्री करावी.

ज्या पालकांनी आधीच या वरील शाळांमध्ये प्रवेश घेतला आहे, त्यांनी तात्काळ तो रद्द करून अधिकृत शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पनवेल महानगरपालिका नागरिकांच्या हितासाठी कटिबद्ध असून, शिक्षणाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असेही प्रशासनाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे यांनी सांगितले आहे.

# खारघरमध्ये बेकायदा पार्किंगवर वाहतूक शाखेची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील गोखले शाळेकडून शिल्प चौकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्ता गेल्या काही दिवसांपासून सतत कोंडीच्या विळख्यात सापडत होता. ही कोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलिसांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. बेकायदा पार्किंगमुळे रस्ता व्यापणाऱ्या तब्बल ८० वाहनांवर पोलिसांनी ऑनलाईन दंडात्मक कारवाई केली असून, काही वाहने थेट उचलून नेली आहेत.

खारघर वाहतूक विभागाचे पोलिस अधिकारी भरत थिटे यांनी गोखले शाळेकडून शिल्प चौकाकडे जाणारा रस्ता हा महत्त्वाचा दळणवळण मार्ग असून, शाळा, निवासी वसाहती आणि व्यावसायिक आस्थापनांमुळे येथे नेहमीच मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनचालक बेकायदा पार्किंग करत असल्याने कोंडी होत होती. यामुळे पादचाऱ्यांना आणि शालेय विद्यार्थ्यांना नाहक मनस्तापाला सामोरे जावे लागत होते. याची दखल घेत खारघर वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई केली. दरम्यान, वाहतूक विभागाने वाहनचालकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# पनवेल महापालिकेकडून अग्निशमन सेवा सप्ताहनिमित्त व्यापक जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत असून, अग्निसुरक्षेबाबत जनजागृती वाढवण्यासाठी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत 'अग्निशमन सेवा सप्ताह' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे.



या सप्ताहाचा शुभारंभ १४ एप्रिल रोजी कळंबोली अग्निशमन केंद्र या ठिकाणी शहिद जवानांना श्रध्दांजली देऊन करण्यात आला. यावेळी आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अरविंद मांडके, माजी मुख्य अग्निशमन अधिकारी एमआयडीसी, अग्निशमन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दिनांक १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई बंदरात झालेल्या भीषण स्फोट दुर्घटनेत शहीद झालेल्या अग्निशमन जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा सप्ताह साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेसाठी सातत्याने प्रयत्नशील असून, अत्याधुनिक साधनसामग्री व प्रशिक्षित मनुष्यबळाच्या माध्यमातून अग्निशमन सेवा अधिक सक्षम केली आहे.

"सुरक्षित शाळा, सुरक्षित रुग्णालय आणि सुरक्षिततेसाठी जागरूक समाज आग प्रतिबंधकतेसाठी एकत्र येऊ." हे या वर्षीचे घोषवाक्य असून या अनुषंगाने जनजागृती कार्यक्रम महापालिकेच्यावतीने राबविण्यात येत आहेत. या सप्ताहांतर्गत १४ ते २० एप्रिलपर्यंत व्यापक जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत असून या अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

यामध्ये १५ ते १९ एप्रिल २०२६ निवासी इमारती, कारखाने, गोदामे, रुग्णालये व मॉल्स या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन नागरिकांना अग्निसुरक्षा उपाययोजनांचे प्रात्यक्षिक, अत्याधुनिक अग्निशमन साहित्याचे प्रदर्शन तसेच अग्निशमन विभागाच्या सुसज्ज वाहनांची रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीद्वारे नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यामध्ये गेल्या दोन दिवासांमध्ये कळंबोलीमधील विविध सोसायट्या तसेच शाळांमध्ये जाऊन अग्निसुरक्षा उपाययोजनांचे प्रात्यक्षिक दिले जात आहे. या सप्ताहाची सांगता २० एप्रिल २०२६ मुंबई येथे होणार आहे.

पनवेल महानगरपालिका शहरातील वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर अग्निसुरक्षेच्या उपाययोजनांना अधिक बळकटी देत असून, नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहे. या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होऊन संभाव्य दुर्घटना टाळण्यास मोठी मदत होणार आहे.

# पनवेल कल्चरल सेंटरचा उद्या ३६वा वर्धापन दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्तत**

नव्या मुंबईवर आपला सांस्कृतिक ठसा उमटविणारी, पनवेलचा सांस्कृतिक मानदंड मानली जाणारी व पनवेलकरांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेली 'पनवेल कल्चरल सेंटर' ही संस्था ३६ वर्षांची वाटचाल यशस्वीपणे पूर्ण करीत असून संस्थेने १९ एप्रिल २०२६ रोजी ३६व्या वर्धापन दिनाचे आयोजन केले आहे. सकाळच्या सत्रात सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक तन्मय देवचके आणि त्यांच्या सहकलाकारांचा 'सृजन – रागदारी : फोक ते फ्युजन' हा कार्यक्रम होईल.

संध्याकाळच्या सत्रात सुरुवातीला संस्थेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कथक स्पर्धेतील विजेत्या कलाकारांचे कथक सादरीकरण होईल व त्यानंतर वर्धापन दिनाचा मुख्य कार्यक्रम होईल. संस्था गेली अनेक वर्षे संगीत–नाट्य–साहित्य–कलाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या परंतु, प्रसिद्धीच्या झोतात फार न आलेल्या गुणी व्यक्तींचा शाल–श्रीफळ, मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करते. ह्यावर्षी संस्था बाबादास तुपे या गानगुरुंचा गौरव करणार आहे.

हा समारोह पनवेलमधील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात सकाळी ९.३० ते १२.०० आणि सायंकाळी ५.३० ते ८.३० अशा दोन सत्रात आयोजित केला जात असून संस्थेच्या सभासदांना त्याचा विनामूल्य आनंद घेता येईल. सदस्येतर रसिकांसाठी दोनशे रुपये प्रवेशमूल्याच्या प्रवेशिका पनवेल कल्चरल सेंटरमध्ये ('आशीर्वाद' व्ही. के. हायस्कूजवळ, पनवेल) सायं. ५.३० ते ८.०० दरम्यान अथवा इम्प्रेशन्स, शुश्रुषा हॉस्पिटलसमोर, पनवेल येथे सकाळी ११.०० ते दु. ३.०० व सायं. ५.३० ते ९.३० दरम्यान उपलब्ध आहेत.

# उलवे येथे महापुरुषांचा संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

द बुद्धिस्ट वेल्फेअर ट्रस्ट आणि तेजस्विनी महिला ट्रस्ट, उलवे यांच्या संयुक्त विद्यमाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती २०२६ अंतर्गत प्रियदर्शी सम्राट अशोक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव तसेच बुद्ध विहार नामकरण सोहळा, प्लॉट क्रमांक १२३, सेक्टर ९, उलवे येथे दि. ११ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडला.

दि. ११ एप्रिल रोजी "आरोग्य दिन" साजरा करण्यात आला. यामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, अस्थिरोग, रक्त तपासणी, दंत व नेत्र तपासणी अशा विविध सेवांचा लाभ नागरिकांनी घेतला. सायंकाळी सम्राट अशोक व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन व अभिवादन करण्यात आले. यावेळी बुरबुरे ताई, मिलिंद कांबळे व संविधान प्रवर्तक अजित देसाई यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद गजबे यांनी केले, तर अध्यक्षस्थानी मधुकरजी रगडे होते.

१२ एप्रिल रोजी "शैक्षणिक दिन" साजरा करण्यात आला. निबंध, चित्रकला, भाषण, प्रश्नमंजुषा व जातक कथा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावंती हबळे हिने केले. सायंकाळी करिअर मार्गदर्शन सत्रात कमलाकांत अंकुश यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१३ एप्रिल रोजी "मनोरंजन दिन" अंतर्गत महिलांसाठी रांगोळी, संगीत खुर्ची व पाककला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पाककला स्पर्धेसाठी सौ. शोभना कानस्कर तर रांगोळी स्पर्धेसाठी सोनम कर्णिक यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमात वेशभूषा, नृत्य व बुद्ध–भीम गीत सादर करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द बुद्धिस्ट वेलफेयर ट्रस्टचे अंतर्गत तपासणीस चंद्रकांत खरे साहेब यांनी केले

१४ एप्रिल रोजी महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन, बुद्ध वंदना व शुद्ध पठण करण्यात आले. बुद्ध विहाराचे नामकरण भन्ते प्रज्ञा शाक्य (बेलापूर) यांच्या हस्ते पार पडले. यावेळी धम्मदेशना, मान्यवरांचा सत्कार व बक्षीस वितरण सोहळा झाला. सायंकाळी बुद्ध वंदनेने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

या कार्यक्रमास आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, रवी पाटील, राजेंद्र दादा, वितेश म्हात्रे, निलेश खारकर, जिज्ञासा ताई , सुहास देशमुख, सचिन येरुणकर, योगिता भगत, माई भोईर, रचना येरुणकर आम्ही उलवेकर महिला मंडळ अध्यक्ष कीर्ती फाटक आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली.

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ॲड. सचिन उघडे, उपाध्यक्ष अमोल दहिवले, सचिव डॉ. इंदुलकर, खजिनदार पपिहा मर्चंडे तसेच डॉ. सुमेध इंगोले, मिलिंद कांबळे, अपर्णा गायकवाड, विनायक गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रसायनीत पेन्शनर एकवटले!

**मोहोपाडा :** रसायनी व आजूबाजूच्या गावातील पेंन्शनर अरुण मानकामे व देवर्षिच सोमण यांच्या अध्यक्षतेखाली पाताळगंगा श्री रसेश्वर मंदीर येथे एकत्रीत जमून पेन्शनर एकत्र एकवटले. डॉ मनसुख मांडविया कामगार व उद्योग मंत्री यांनी कमांडर अशोक रावत राष्ट्रीय अध्यक्ष यांना लेखी आश्वासन दिले असल्यामुळे सर्व पेन्शनर एकत्रीत आले होते व त्यांना उत्तम रित्या मार्गदर्शन अरुण माछा मानकामे यांनी केले. उपस्थीत सर्व पेन्शनदारांनी त्यांचे आनंदाने स्वागत केले.त्यावेळेस सर्वांच्या चेहऱ्यावरचा आनंद दिसून येत होता' या सर्वांचे श्रेय कमांडर अशोक रावत, सुभाष पोखरकर,अनिल तैडूळकर अरुण मानकामे ,प्राय सोमण,अन अर्चना म्हात्रे, दर्शना सावंत बहुमुल्य श्रम कामास आहे.

# प्रबुद्ध सामाजिक संस्थेतर्फे डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**पनवेल : वार्ताहर**

प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विश्वरत्न बोधिसत्व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आरोग्य तपासणी शिबीर तसेच विविध सामाजिक, तसेच महापुरुषांच्या विचारांचे प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आले.





आमदार महेश बालदी यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित राहून विनम्र अभिवादन केले. यावेळी प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या करंजाडे मधील बौध्द समाज्याच्या वतीने करंजाडेमध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन निर्माण व्हावे यासाठी आरक्षित भूखंड मागणी केली आहे. करंजाडे मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन व्हावे यासाठी यासंदर्भात सिडको सोबत लवकरच बैठक घेण्यात येणार आहे त्यावेळी प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी यांना बैठकीस निमंत्रित केले जाईल, असे सांगितले.

यावेळी पनवेल पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, रुपेश धुमाळ, सोनाली जितेकर (रा.जि.प सदस्य), मनिषा गजानन पाटील (पनवेल पंचायत समिती सदस्य) मा.सचिन वास्कर, लोकनेते दि.बा पाटील २७ गाव समितीचे उपाध्यक्ष सी.टी पाटील, सुनील कटेकर, सचिव – प्रेमजी पाटील, सर्व पदाधिकारी सभासद, माजी सरपंच करंजाडे रामेश्वर आंग्रे, मंगेश शेलार (सरपंच करंजाडे,) मनिषा जयभाये, (ग्रामसेविका मॅडम), सचिन वास्कर, त्याच बरोबर अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे अध्यक्ष कुणाल लोंढे. उपाध्यक्ष गौतम अहिरे, सचिव सुनील बनकर, खजिनदार बापू सावंत, ॲड अमित कांबळे, दिगंबर साळवे, महादेव कांबळे, धनंजय ताटे, गणेश डोळस, राहुल भद्रे, राजेंद्र घोडके, गोकुळ सोनावणे. अनिल दुप्ते, यशपाल कांबळे, पंकज कांबळे, नितीन कांबळे, सचिन सोनवणे, सुबोध सोनावणे, स्वप्नील पवार, कुणाल गायकवाड, उज्वला सोनावणे, कल्पना कांबळे, आरती लोंढे. सोनाली सोनवणे. साधना मोरे, समिधा तांबे. दिपिका कांबळे, आम्रपाली कांबळे, पुनम माने, डायना गायकवाड, नितिक्षा निमसरकार, नैना देवारे, वर्षा कांबळे, सर्व संस्थेचे पदाधिकारी सभासद करंजाडे मधील बौध्द उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# कामोठे येथे सोनसाखळी खेचली

**पनवेल :** कामोठे परिसरात पहाटे पादचारी महिलेवर हल्ला करत सोनसाखळी हिसकावल्याची घटना घडली. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. संबंधित महिला आईसोबत कामोठे येथील बसमधून उतरून पायी जात होती. यावेळी अचानक महिलेच्या मानेवर झडप घालत दुखापत करून चोराने सोनसाखळी हिसकावून पोबारा केला. या चोरीत सुमारे ७ ग्रॅम वजनाची सोनसाखळी चोरी झाली. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणावरून चोराचा शोध सुरू असल्याचे सांगण्यात आले.

# जय पार्श्व लब्धि महिला मंडळाची स्थापना



**पनवेल : वार्ताहर**

धार्मिक कार्यासोबतच समाजसेवा करण्यासाठी नवीन पनवेलमधील जैन महिलांनी एकत्र येत 'जय पार्श्व लब्धि महिला मंडळा'ची नीव ठेवण्यात आली आहे. या मंडळाच्या माध्यमातून आगामी काळात विविध धार्मिक विधी आणि लोककल्याणाचे उपक्रम राबविण्याचा संकल्प महिलांनी केला आहे.

या सेवाकार्याचे पहिले पाऊल म्हणून नवीन पनवेल येथील सेक्टर–१ मधील शिवा कॉम्प्लेक्स परिसरात अन्नदान उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मंडळाची स्थापना आणि सामाजिक उपक्रमाचा प्रारंभ सीमा कांकरिया, पुष्पा गांधी, पद्मावती जैन, चंचल चपलोत, कल्पना कोठारी, ज्योती बाफना, मंजु चतुर आणि कुमारी करुणा गांधी यांच्या पुढाकाराने करण्यात आला.

समाजातील गरजू घटकांना मदत करण्यासोबतच जैन धर्मातील मूल्यांची जोपासना करणे, हे या मंडळाचे मुख्य ध्येय आहे. केवळ धार्मिक विधींपुरते मर्यादित न राहता, विविध समाजोपयोगी मार्गांनी उत्कृष्ट कार्य घडावे, अशी भावना यावेळी उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

# डॉक्टर्स वेल्फेअर असोसिएशनचे स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही DWAP म्हणजेच डॉक्टर्स वेल्फेअर असोसिएशन पनवेलचा तिसरा वार्षिक स्नेहसंमेलनचा कार्यक्रम रविवारी, १२ एप्रिल २०२६ला झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन, डॉ.पटेल सर, लाईफ लाईन हॉस्पिटलचे डॉ. प्रकाश पाटील आणि डॉ जयश्री पाटील, डॉ कुणाल मखिजा, डॉ वीर, यांच्या हस्ते झाले.

असोसिएशन १८ मार्च २०२३ ला स्थापन झाली त्या दिवसापासून ते आजतागायत डॉ. शिरीष जोशी यांनी अध्यक्ष पदाची धुरा अत्यंत निष्ठेने आणि जबाबदारीने पार पाडली. छोट्याशा रोपट्याचे झाडात रुपांतर करायला त्यांनी अत्यंत मेहनत घेतली. ती धुरा आता त्यांनी तितक्याच जबाबदार, निष्ठावान, प्रामाणिक आणि अफाट जनसंपर्क असलेल्या डॉ. सचिन पवार यांच्याकडे सुपूर्द करुन आपला पदाधिकार त्यांच्यावर सोपविला.

या नवीन कार्यकारणीत डॉ अभिजित भोईर यांची उपाध्यक्षपदी, डॉ संकेत पवळ यांची सचिव पदी, डॉ वैभव बैलकर यांची उपसचिव पदी, डॉ उमेश अमृतकर यांच्या उल्लेखनीय, प्रामाणिक जबाबदारी मुळे परत एकदा खजिनदारपदी तर डॉ कल्पना डेरे यांची उपखजिनदार पदी निवड करण्यात आली. सर्व डॉक्टर्स आणि त्यांच्या कुटुंबीयांनी दुपार पासूनच विसावा रिसॉर्टला येवून मनसोक्त आनंद घेतला.



# दहावीत कमी गुण मिळाल्याने विद्यार्थ्याने केली आत्महत्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दहावीच्या परीक्षेमध्ये कमी टक्केवारी पडल्याच्या कारणावरून १७ वर्षीय रोनक विपुल बाथम याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेलमध्ये घडली. या घटनेची नोंद १५ एप्रिल रोजी रात्री अकराच्या सुमारास पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सतरा वर्षीय रोनक विपुल बाथम हा हनुमान कृपा, पनवेल येथे राहत असून त्याला दहावीच्या परीक्षेमध्ये ५५ टक्के गुण मिळाले. टक्केवारी कमी पडल्याच्या कारणावरून त्याने १५ एप्रिल रोजी घराच्या बेडरूममधील सिलिंग फॅनला चादरच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याला गांधी हॉस्पिटल, पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## संपादकीय

# सुभाषित नव्हे, संस्कार!

'वसुधैव कुटुम्बकम' आणि 'भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे' ही आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. आज जगातील अनेक देश अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धाच्या खाईत होरपळत असताना भारताने याच अनोख्या परंपरेचे दर्शन घडविले.

**वेगवेगळे धर्म, विविध परंपरा आणि अनेक भाषा ही भारताची वेगळी ओळख असली तरी या सर्वांना एकत्र जोडून समाजातील ऐक्य टिकवून ठेवणारा सामाजिक ऐक्याचा धागा अनेक शतकांपासून भारताने जिवापाड जपला आहे. हा धागा आज केवळ देशाच्या भौगोलिक सीमांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे ही आपल्या परंपरेची शिकवण आज जगासमोरील आदर्श ठरली आहे. कोविडसारख्या संकटातही भारताने याच परंपरेचे पालन केले, आणि माणुसकी हाच या देशाचा मूलभूत धर्म आहे हेदेखील दाखवून दिले. जेव्हा उभे जग उपायांच्या अभावापायी जगण्यामरण्याशी संघर्ष करत होते, तेव्हा भारताने अल्पावधीत विकसित केलेल्या कोविडविरोधी लशीचा लाभ केवळ भारतातील जनतेपुरताच नव्हता, तर जेथे जेथे माणसे वाचविण्यासाठी मदतीची साद घातली गेली, तेथे तेथे भारत धावून गेला आणि कोविडविरोधी लसीने असंख्यांचे प्राण वाचविले. भारतासमोर देखील ऊर्जासंकट उभे ठाकले आहे. इंधनासाठी बहुतांश प्रमाणात खाडी देशांतील तेलाच्या आयातीवर अवलंबून असलेल्या सर्वच देशांमध्ये ऊर्जासंकट तीव्र होत असून, अनेक देशांची अर्थव्यवस्था अक्षरशः कोलमडण्याच्या कडेलोटावर उभी ठाकली आहे. इंधन टंचाईमुळे महागाईचा भस्मासुर डोके वर काढू लागला आहे. हे संकट केवळ कोणा देशावर नव्हे, तर मानवजातीवर आहे, या जाणिवेतून संकटकाळात मदतीचा हात देणाऱ्या मोदी सरकारने आपल्या संस्कृतीची ही शिकवण पुन्हा अंमलात आणली आहे. भारताचे शेजारी असलेले बांगला देश, श्रीलंका, मालदीव आदी लहान देशांना या युद्धस्थितीचे चटके अधिक तीव्रपणे बसू लागले आहेत. या परिस्थितीतही भारताच्या अर्थव्यवस्था आणि ऊर्जास्थितीचा तोल सांभाळून जनतेला दिलासा देण्याकरिता मोदी सरकारने केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा करावयास हवी. या संकटात भारताने स्वतःस तर सांभाळलेच, पण शेजारच्या काही देशांची ऊर्जा स्थिती सांभाळण्यासाठी बजावलेल्या भूमिकेची नोंद जागतिक संघर्षकाळाच्या इतिहासात निश्चितच केली जाणार आहे. बांगलादेश, श्रीलंकेत महागाईचा भडका उडाला, इंधनाअभावी अनेक कारखाने बंद पडले, उत्पादन थांबल्यामुळे रोजगाराच्या समस्या उग्र झाल्या आणि बेरोजगारीच्या संकटात अनेक कुटुंबे होरपळू लागली आहेत. जेव्हा एखादा देश केवळ परकीय संसाधनांवरच अवलंबून असतो, तेव्हा अशा संसाधनांचा पुरवठा थांबल्यास त्या देशाच्या अर्थव्यवस्थेबरोबरच सामाजिक स्वास्थ्याची घडीदेखील विस्कटून जाते. बांगलादेश, श्रीलंकेत या युद्धस्थितीमुळे नेमकी तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे, आणि भारताच्या संस्कृतीने दिलेली शेजारधर्माची शिकवण आज मोदी सरकार कृतीत आणत आहे. इंधनाच्या तुटवड्यामुळे बेजार झालेल्या बांगलादेशात उद्योगधंदे बंद पडण्याच्या मार्गावर असताना मोदी सरकारने शेजारधर्माच्या भावनेतून मैत्री पाईपलाईनद्वारे बांगलादेशात पाठविलेले १५ हजार टन डिझेल हे माणुसकीच्या जाणिवेचे उत्तम उदाहरण ठरते. श्रीलंकेतही ऊर्जासंकट तीव्र झाल्यानंतर भारताने गेल्य महिनाअखेरीस ३८ हजार टन डिझेलचा पुरवठा केल्याने श्रीलंकेची डिझेलची जवळपास निम्मी गरज भारताच्या मदतीमुळे भागविली गेली. नेपाळ, भूतानसारख्या शेजाऱ्यांनाही भारताने पुरविलेल्या पेट्रोलियम पदार्थांमुळे या संकटात मोठा दिलासा मिळाला आहे. वसुधैव कुटुम्बकम ही केवळ भावनिक शिकवण नाही, तर अंमलात आणावयाचा संस्कार आहे, हे मोदी सरकारने दाखवून दिले, ही बाब प्रत्येक भारतीयाची मान अभिमानाने उंचावणारी आहे.**

# नारी शक्ती : मूलभूत सन्मानापासून स्वतःचे अवकाश

"स्त्रियांना फक्त गृहिणी म्हणून पाहण्याचे दिवस गेले; आता त्यांना राष्ट्रनिर्माते म्हणून पाहण्याची गरज आहे."
: पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी



भारतातील एखाद्या गावातील तिशीतली स्त्री डोळ्यासमोर आणा. काही वर्षांपूर्वी ती पहाटे अंधारात, भीतीच्या छायेत घराबाहेर जाऊन नैसर्गिक विधी आटोपत असे. घरातील सर्वांसाठी पाणी दूरवरून आणणे, लाकडाच्या धुरात स्वयंपाक करणे, स्वतःच्या नावावर घर नसणे, बँक खाते नसणे अशा अनेक मर्यादांमध्ये तिचे आयुष्य अडकलेले होते, पण आज ही परिस्थिती बदलली आहे. या परिवर्तनाला नाव आहे "नारी शक्ती". गेल्या काही वर्षांत महिलांच्या जीवनातील प्रत्येक पैलू एकमेकांशी जोडून बदल घडविण्याचा प्रयत्न झाला आहे.

सन्मानाला प्राधान्य : महिलांच्या सन्मानाची सुरुवात मूलभूत गरजांपासून झाली. स्वच्छ भारत अभियानातून कोट्यवधी शौचालयांची निर्मिती झाली आणि ग्रामीण भारत खुले शौचालयमुक्त झाला. यामुळे महिलांची सुरक्षितता वाढली. जल जीवन मिशनमुळे घराघरात नळजोडणी झाली आणि पाण्यासाठी होणारी दररोजची कसरत कमी झाली. उज्ज्वला योजनेतून महिलांच्या नावावर गॅस कनेक्शन मिळाले, धुरामुळे होणारे आरोग्याचे त्रास कमी झाले. प्रधानमंत्री आवास योजनेत महिलांच्या नावावर घरे देण्यात आली, ज्यामुळे त्यांना मालकी हक्क आणि आर्थिक सुरक्षितता मिळाली. शौचालय, पाणी, इंधन आणि घर, हे केवळ योजना नसून सन्मान पुनर्स्थापित करण्याचा एकत्रित प्रयत्न आहे.

जन्मापासून आरोग्याची हमी : महिलांच्या सक्षमीकरणाची सुरुवात जन्मापूर्वीपासूनच होते. पोषण अभियान (POSHAN २.०) बालकांच्या पहिल्या १००० दिवसांवर लक्ष केंद्रित करते. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतून मातांना थेट आर्थिक मदत मिळते. सुरक्षित मातृत्व आश्वासन 'सुमन' योजना राबविण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि जीवन ज्योती विमा योजना यामुळे महिलांना आर्थिक संरक्षण मिळाले. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'मुळे मुलींच्या जन्मदरात सुधारणा झाली, तर 'सुकन्या समृद्धी' योजनेमुळे मुलींचे भविष्य सुरक्षित झाले.

जगण्यापासून स्वप्नांकडे : आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा कणा आहे. जनधन योजनेमुळे कोट्यवधी महिलांना बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले. मुद्रा योजनेत महिलांना मोठ्या प्रमाणावर कर्ज मिळाले. स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून महिलांनी उद्योग, व्यवसाय सुरू केले. 'लखपती दिदी' ही संकल्पना ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. 'नमो ड्रोन दिदी'सारख्या उपक्रमातून महिलांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जात आहे.

सुरक्षा आणि न्याय : महिलांच्या सुरक्षिततेसाठी 'मिशन शक्ती' अंतर्गत सखी वन-स्टॉप केंद्र सुरू करण्यात आली आहेत, जिथे कायदेशीर, वैद्यकीय आणि समुपदेशन सेवा एकाच ठिकाणी मिळतात. महिला हेल्पलाईन, निर्भया निधी आणि इतर उपक्रमांनी सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत केली आहे. तात्काळ तीन तलाक बंदी हा महिलांच्या अधिकारांसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

महिलांचा अवकाश : आज भारतीय महिला प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत आहेत. अवकाश संशोधनापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत त्यांनी आपली छाप पाडली आहे. महिला आता केवळ सहभागी नाहीत, तर नेतृत्वही करत आहेत. STEM क्षेत्रातही महिलांची संख्या वाढत आहे.

संवैधानिक टप्पा : 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाचा ऐतिहासिक निर्णय आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३% आरक्षण देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पंचायती राज व्यवस्थेतही जवळपास अर्ध्या प्रतिनिधी महिला आहेत. महिलांचे नेतृत्व वाढल्यास समाजातील विकास अधिक सर्वसमावेशक होतो, हे सिद्ध झाले आहे.

३६० अंशांचा दृष्टिकोन : शौचालय, पाणी, इंधन, घर, आरोग्य, रोजगार, सुरक्षा आणि प्रतिनिधित्वहे सर्व घटक एकमेकांशी जोडलेले आहेत. यापैकी एक जरी तुटला, तरी सक्षमीकरणाची साखळी अपूर्ण राहते. म्हणूनच हा ३६० अंशांचा दृष्टिकोन आहेमहिलांच्या संपूर्ण जीवनाचा विचार करणारा. आज भारत 'कल्याणकारी' दृष्टीकोनातून 'महिला-नेतृत्वाखालील विकास' या दिशेने वाटचाल करत आहे. या प्रवासात प्रत्येक महिलेला सोबत घेणे हीच खरी प्रगती ठरेल. "नारी शक्ती पुढे चालली आहे; आता देशाने कोणतीही महिला मागे राहू देऊ नये."

**-आर. विमला (भा. प्र. से.) सचिव तथा निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन**

# महिला सक्षमीकरण काळाची गरज

'नारीशक्ती वंदन अधिनियम' यामध्ये महिलांसाठी आरक्षण विधेयक करून संबोधले जाते. याचा मुख्य उद्देश महिलांना राज्याच्या तसेच देशाच्या राजकारणात कार्यरत राहण्याची अधिक संधी उपलब्ध करून देणे असा आहे. हा निर्णय भारतीय लोकशाहीतील महिलांच्या सक्षमीकरणासाठी उचललेले एक ऐतिहासिक पाऊल असेल.

हे विधेयक सप्टेंबर २०२३मध्ये दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आले. याची अंमलबजावणी होण्यासाठी 'नारीशक्ती वंदन अधिनियम' वर्ष २०२४ उजाडले आहे. लोकसभा आणि राज्याच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के (एक तृतीयांश) जागा राखीव असतील.

आपण महाराष्ट्राच्या पवित्र भूमीमध्ये जन्माला आलो, वाढलो आणि येथेच मतदाता म्हणून मतदान करू लागलो. महाराष्ट्राच्या पावन भूमीत माता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडवले. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी सुशासनाचा आदर्श प्रस्थापित केला. सावित्रीबाई, आनंदीबाई (बाया) कर्वे, रमाबाई रानडे, रमाबाई आंबेडकर यांसारख्या महान स्त्रीकर्तृत्वांनी इतिहास घडवला हे आपणा सर्वांना ज्ञात आहे.

आपल्या देशाच्या विद्यमान नेतृत्वाकडून भारतमातेच्या कन्यांच्या, महिलांच्या सामर्थ्याची ओळख जाणून हा अधिनियमाचा निर्णय घेतला आहे. यामुळे कोट्यवधी महिलांच्या स्वप्नांना आशेचा किरण दिसत आहे. अनेक वर्षांची प्रतीक्षा आता पूर्ण होऊन संकल्प सिद्धीस जाणार आहे.

आपण दाखवलेला हा विश्वास देशातील व विशेषतः महाराष्ट्र राज्यातील महिला नक्कीच सार्थ ठरवतील. विकसित भारताच्या जडण-घडणीत महिला सक्रिय सहभाग देतील असा आम्हाला विश्वास वाटतो. 'राजकारणात सहभाग' हा केवळ मतदानापुरता किंवा आर्थिक सक्षमीकरणापुरता मर्यादित नसून निर्णय प्रक्रिया, राजकीय सक्रियता, राजकारणाचा समाजकारणासह विचार व आचार अशा अनेक सकारात्मक बदलांची ही नांदी असेल.

सर्वसमावेशक लोकशाही हे महिलांच्या सक्रिय सहभागातून साकारण्यासाठी 'नारीशक्ती वंदन अभियान' राबवले जात आहे. सर्वप्रथम मतदार यादीतील नाव पडताळणी, नाव नोंदणी सुरू आहे. या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. जनजागृतीची सर्व साधने यांत सहभागी आहेत. 'नारीशक्ती वंदन अभियान' व विधेयकाची अंमलबजावणी लवकरात लवकर होवो, महिलांसाठी प्रगतीचे सर्व मार्ग यातून खुले होतील. त्यासाठी भारतीय बांधव 'संगच्छध्वं संवदध्वं' या उक्तीप्रमाणे एकत्रित कार्य करतील अशी आशा आहे. भारत माता की जय!

**-अनघा नीरज ताम्हनकर**
संस्कृतभारती पनवेलजनपद
(सहमन्त्रिणी)



## बदलते तंत्रज्ञान

### युट्यूब शॉर्ट्सचा नाद सुटणार; कंपनीने आणलं नवं सेटिंग

जर तुम्हाला किंवा तुमच्या मुलांना तासनतास यूट्यूब शॉर्ट्स पाहण्याची सवय लागली असेल, तर आता तुमच्यासाठी एक दिलासादायक बातमी आहे. युट्यूबने अखेर एक असे फीचर आणले आहे, ज्याच्या मदतीने तुम्ही शॉर्ट्स फीड कायमचे बंद करू शकता. कंपनीने शॉर्ट्ससाठी 'टाइम लिमिट' सेटिंगमध्ये मोठा बदल केला असून, आता युजर्सना ही मर्यादा थेट झिरोवर सेट करण्याची सुविधा मिळाली आहे.




युट्यूबवर याआधीही टाइम लिमिट सेट करण्याचा पर्याय होता, मात्र त्यात किमान १५ मिनिटे शॉर्ट्स पहावेच लागत होते. आता कंपनीने हे अपडेट केले असून, युजर्स वेळेची मर्यादा '०' मिनिटांवर सेट करू शकतात. एकदा का तुम्ही ही सेटिंग 'झिरो' वर सेट केली, की तुमच्या यूट्यूब फीडमध्ये शॉर्ट्स दिसणे बंद होईल. तुम्ही चुकून शॉर्ट्स सेक्शनमध्ये गेलात तरी तिथे एक पॉप-अप येईल, जो तुम्हाला आठवण करून देईल की तुमची डेली लिमिट संपली आहे.

आजकाल मुले तासनतास मोबाइलवर शॉर्ट्स पाहत बसतात, ज्यामुळे त्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो. अशा पालकांसाठी हे फिचर वरदान ठरणार आहे. विशेष म्हणजे, जे अकाऊंट्स 'गुगल फॅमिली लिंक'द्वारे मॅनेज केले जातात, त्यामध्ये मुले स्वतःहून ही सेटिंग बदलू शकणार नाहीत. यामुळे पालकांना मुलांच्या स्क्रीन टाइमवर पूर्ण नियंत्रण ठेवता येईल.

सेटिंग कशी ऑन करायची?

यूट्यूबने हा पर्याय सेटिंगमध्ये थोडा आत लपवून ठेवला आहे. तो शोधण्यासाठी खालील स्टेप्स फॉलो करा...

१. सर्वात आधी तुमचे YouTube App ओपन करा.

२. उजव्या कोपऱ्यात असलेल्या प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करा.


३. आता Settings मध्ये जाऊन Time Management हा पर्याय निवडा.

४. खाली स्क्रॉल केल्यावर तुम्हाला Daily Shorts Feed Limit हा पर्याय दिसेल.

५. येथील टॉगल बटण ऑन करा आणि वेळेच्या पर्यायांपैकी 'Zero Minutes' निवडा.

आता तुमच्या फीडमधून शॉर्ट्स गायब होतील आणि तुमचा मौल्यवान वेळ वाचण्यास मदत होईल. हे फिचर सध्या टप्प्याटप्प्याने रोल आउट केले जात आहे.

# क्रांतिकारक दामोदर हरी चाफेकर



## निमित्त

हरिभाऊ चापेकर या एका कीर्तनकारांच्या घरी २५ जून १८६९ रोजी दामोदर चाफेकर यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच टिळकांच्या विचारांचा प्रभाव दमोदर यांच्यावर होता. २२ जून १८९७ रोजी पुण्यातील गणेशखिंडीत दामोदरपंतांनी आणि त्यांच्या सहकार्यांनी वॉल्टर चार्ल्स रँड आणि आयर्स्टचा वध केला. इंग्रजांनी दामोदरपंतांना १८ एप्रिल १८९८ रोजी पुण्यातील येरवडा तुरूंगात फाशी दिली.

लहानपणापासूनच दामोदर चापेकर यांना व्यायामाची आवड होती. समवयस्क मित्रांना संघटित करून त्यांनी एक व्यायामशाळा सुरू केली. इंग्रजांकडून करण्यात येणाऱ्या अत्याचाराची दामोदरपंतांना मनस्वी चीड होती. दामोदरपंतांचे लहान भाऊ बाळकृष्ण हरि चापेकर व वासुदेव हरि चापेकर दोघेही त्यांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होत होते.

या तिन्ही भावांना चापेकर बंधू नावाने ओळखले जाते. हे तिन्ही भाऊ लोकमान्य टिळक यांच्या संपर्कात होते. टिळकांना ते गुरू मानत असत. त्यांचे वडील हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ हरि कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यामुळे चापेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला. विठ्ठलभक्ती करणाऱ्या या मराठी कुटुंबाने देशासाठी प्राण अर्पण करणारे ३ तरणीबांड मुलेही दिली.

पुण्यामध्ये १८९७ मध्ये प्लेगची साथ आली. प्लेगपीडित रुग्णांना शोधून उपचार करण्याच्या नावावर इंग्रजांनी पुण्यातील घराघरात शोध मोहीम उघडली आणि अत्याचाराचा कहर केला. यामुळे इंग्रजांविरोधात असंतोष पसरू लागला. तत्कालीन जिल्हाधिकारी वाल्टर चार्ल्स रँड हा अत्यंत क्रूर, खुनशी होता. पुण्याच्या नागरिकांवर अत्याचार करण्यात तो सर्वात पुढे होता. बाळ गंगाधर टिळक आणि आगरकर यांनी या अत्याचाराविरोधात टीका केली. यामुळे त्यांना जेलमध्ये टाकण्यात आले.


दरम्यान, दामोदरपंतांनी रँडची हत्या करण्याची योजना आखली. २२ जून १८९७ रोजी पुण्यातील गणेशखिंडीत रँड आणि त्याचा सहकारी लेफ्लनंट आयस्टर यांची एका कार्यक्रमाहून परतत असताना गोळ्या झाडून हत्या केली.

गणेश आणि रामचंद्र या द्रविड बंधूंनी केलेल्या गद्दारीमुळे इंग्रजांना हल्लेखोरांची नावे कळाली आणि त्यांनी दमोदरपंतांना अटक केली. त्यानंतर काही दिवसातच बाळकृष्ण व वासुदेव चापेकर, तसेच महादेव रानडे या सर्वांनाच पकडण्यात आले. इंग्रजांनी दामोदरपंतांना १८ एप्रिल १८९८ रोजी पुण्यातील येरवडा तुरुंगात फाशी दिली.

दामोदर चापेकर यांचे कार्य भारतीय स्वातंत्र्य चळवळीत एक महत्त्वाचे योगदान होते आणि त्यांनी राष्ट्रीय विचारांना प्रोत्साहन दिले. दामोदर चापेकर यांनी स्वतःचे आत्मचरित्र लिहिले होते, परंतु ते त्यांच्या ताब्यात ठेवले गेले. येरवडा तुरुंगात असताना त्यांनी आपला जीवन प्रवास आणि क्रांतीकार्याचे तपशील नमूद करणारे १०० पानी आत्मवृत्त मोडीत लिहून काढले. ते वि.गो.खोबरेकर यांनी संपादित करून मराठीत आणले. १९७४ साली ते राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थेने प्रकाशित केले.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### कडुलिंबाचा पाला म्हणजे आरोग्यासाठी वरदान!

असं म्हणतात औषध जेवढं कडू तेवढंच गुणकारी असतं. असे नैसर्गिक उपचार सर्वांत जास्त फायदेशीर ठरतात. मुख्य म्हणजे अशा उपायांचे शक्यतो दुष्परिणाम होत नाहीत. कडुलिंबाचा पाला सगळीकडे उपलब्ध असतो, मात्र तो वैद्यकीयदृष्ट्या प्रचंड समृद्ध आहे हे आपल्याला माहिती नसते.



कडुलिंबाचा रस कडू असल्याने आपण तो सेवन करण्यासाठी नाक मुरडतो, पण तुम्हाला हे माहिती आहे का? शरीरासाठी कडुलिंबाचा पाला फारच उपयोगी ठरतो. रोगराईसुद्धा पाल्यामुळे दूर राहते. शरीराची प्रतिकार क्षमता वाढवण्यासाठी कडुलिंबाची पाने फार फायदेशीर ठरतात.कडुलिंबात अनेक जीवनसत्वे व खनिजे असतात. यकृताचे कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी कडुलिंब मदत करते. त्याचप्रमाणे या पाल्याची रक्तशुद्धीकरणास मदत होते. सर्दी खोकल्याच्या संसर्गापासूनदेखील हा पाला शरीराला वाचवतो.

कडुलिंबाची पाने कर्करोग होण्याचा धोका कमी करतात, बरेच जण वजन कमी करण्यासाठी देखील या पानांचे सेवन करतात. दातांच्या, हिरड्यांच्या मजबूतीसाठी हा पाला उपयुक्त आहे. कडुलिंबाच्या पाल्यात फॅटी ॲसिड असते. जे केसांच्या मजबूतीसाठी व वाढीसाठी उपयुक्त असते. यात अँटी ऑक्सिडंट्स असतात. रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी ते उपयुक्त असतात. पाल्याचा रस केसांना लावून नाहणेसुद्धा फायदेशीर ठरते. त्याचप्रमाणे पाल्याचा रस चेहऱ्यावर लावल्याने त्त्वचादेखील छान राहते. मुरूम, सुरकुत्या चेहऱ्यावरील डाग कमी होतात. तज्ज्ञ सांगतात, खास करुन रिकाम्या पोटी कडुलिंबाचा पाला सेवन करावा, आतड्यांसाठी ते जास्त फायदेशीर ठरते. रक्तातील साखर वाढणे हे शारीरिकदृष्या एक वाईट लक्षण आहे, ही साखर आटोक्यात ठेवण्यासाठी कडुलिंबाचा पाला गुणकारी ठरतो.

या पाल्यात फायबरचे प्रमाण जास्त असल्याने ते पोट साफ होण्यास मदत करते आणि पोट फुगणे थांबवते. या पाल्याचा रस विविध प्रकारे सेवन करता येतो. हळद आणि पाला एकत्र खाल्यास आणखी फायदेशीर ठरते. पाल्याची पेस्ट करुन, पाला पाण्यात उकळवून, त्याचा रस काढून, पाने भाजून, आदी. वेगवेगळ्या प्रकारे पाला सेवन करता येऊ शकतो, मात्र कडुलिंबाची ताजी पाने रिकाम्या पोटी चावून खाणे जास्त फायदेशीर ठरते.

# श्रीवर्धन शहरात चोर आल्याच्या अफवा

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण ▌ रात्रीच्या पोलीस बंदोबस्तात वाढ

**श्रीवर्धन : बातमीदार**

मागील महिन्यामध्ये श्रीवर्धन येथे तीन घरपोडीच्या घटना घडल्या होत्या. या घटनांचा पोलीस तपास सुरू आहे, मात्र तेव्हापासून श्रीवर्धन शहरामध्ये वारंवार चोर आल्याच्या अफवा पसरत आहेत. रात्रीच्या वेळी नागरिक हातामध्ये काठ्या, सोटे घेऊन पहारा देत आहेत.

या चोरीच्या अफवांबाबत बाबत रायगडचे अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतारे यांनी श्रीवर्धन येथे नागरिकांची बैठक आयोजित केली. यावेळी अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये असे आवाहन करण्यात आले, परंतु याच अफवांचा फायदा घेऊन कोणीतरी खोडसाळ व्यक्ती विनाकारण नागरिकांच्या घरावर खडा फेकून मारणे, दरवाज्याची कडी वाजवणे, असे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे चोर आल्याची बोंबाबोंब अजून जोर धरत आहे.

श्रीवर्धन शहरातील काही सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक व्यक्ती हातात लोखंडी सळी घेऊन तोंडावरती मास्क चढवून फिरताना दिसून आला आहे. सदर व्यक्ती सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसल्यानंतर तो नवी पेठ परिसराकडे पळून जाताना दिसला आहे. आणि लगेचच तिथून एक रिक्षा रात्री दोन वाजून ४० मिनिटांच्या सुमारास गेलेली सीसीटीव्ही मध्ये दिसत आहे, मात्र सदर सीसीटीव्हीत दिसणारी व्यक्ती याने पूर्णपणे आपला चेहरा मास्क लावून झाकून घेतला असल्यामुळे सदर व्यक्तीची ओळख पटवणे कठीण झाले आहे. पोलिसांकडून रात्रीच्या गस्तीमध्ये वाढ करण्यात आली असली तरी कोणत्या ना कोणत्या भागामध्ये चोर आल्याची बोंबाबोंब पसरते. जर चोराला चोरी करायची असेल तर तो कुणाच्या घरावरती खडे फेकून मारणार नाही किंवा दाराची कडीदेखील वाजवणार नाही.

**चर्चा जोरात; मात्र तक्रार नाही!**

सध्या सुरू असलेले हे प्रकार थांबवण्यासाठी पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्याची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी चोर पाहिला, चोर पाहिला अशाप्रकारे सांगितले जाते. परंतु तो कोणी पाहिला याबाबत कोणीही ठामपणे सांगताना आढळून येत नाही. किंवा पोलीस ठाण्यात जाऊन त्याबाबत तक्रारही देत नाही. केव्हा मोबाईल फोन करून अथवा सांगोसांगी चोर दिसला चोर दिसला, अशी चर्चा करण्यात येते.

# अक्षय्य तृतीयेला बालविवाह होणार नाही याकरिता सज्ज रहावे -जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

१९ एप्रिल २०२६ रोजी अक्षय तृतीया हा साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त आहे. त्यादिवशी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळे आयोजित केले जातात. या दिवशी धार्मिक विधी करताना बाहविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता अक्षय तृतीयेच्या दिवशी जिल्ह्यात बालविवाह होणार नाही याकरिता जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी सज्ज रहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सर्व संबंधित यंत्रणांना दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात दुरदूश्यप्रणालीद्वारे आयोजित बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांसह विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित होते. तर तालुका स्तरीय अधिकारी दुरदूश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी दुरदूश्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, अक्षय्य तृतीयेच्या दिवशी जिल्ह्यात एकही बालविवाह होता कामा नये. यासाठी धार्मिक स्थळे, मंगल कार्यालये, समुद्रकिनाऱ्यांवरील हॉटेल्स आणि पर्यटनस्थळांवर विशेष पाळत ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार, मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे कमी असणे अनिवार्य आहे.

त्या दिवशी जिल्ह्यात एकही बालविवाह होणार नाही याकरिता ग्रामपंचायत अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि मुख्याध्यापकांनी यावर लक्ष ठवावे. बालविवाह होत असल्यास जिल्हा बालसंरक्षण कक्ष, पोलीस विभाग तसेच चॉईल्ड हेल्पलाईन क्रमांक १०९८ वर तात्काळ कळवावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# पाणीटंचाईग्रस्त आर्डे गावासाठी कर्जत पंचायत समितीकडून अधिकाऱ्यांची झाडाझडती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पाषाणे ग्रामपंचायतीमधील आर्डे गावामध्ये गेली दोन महिने पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. हे समजताच कर्जत पंचायत समितीचे पदाधिकारी आणि अधिकारी आर्डे गावात पोहचले. सभापती नमिता घारे यांनी येथील पाणीटंचाई दूर करण्यासाठी प्रथम ग्रामस्थांशी चर्चा केली आणि नंतर ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली.

कर्जत तालुक्यातील पाषाणे ग्रामपंचायत हद्दीतील आर्डे गावात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या समस्येची माहिती मिळतच कर्जत पंचायत समितीचे पदाधिकारी आणि अधिकारी आर्डे गावात पोहचले. पंचायत समितीच्या सभापती नमिता घारे आणि गटविकास अधिकारी सुशांत पाटील हे तातडीने थेट गावात पोहचले. गावात सुमारे १४०० ते १५०० नागरिकांची वस्ती असून लघुपाटबंधारे विभागाच्या माध्यमातून धरणाजवळ बंधारा उभारून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. मात्र अलीकडील काळात पाणी अत्यल्प प्रमाणात येत असल्याने महिलांना पाणी भरण्यासाठी लांब पायपीट करावी लागत आहे. कपडे धुण्यासाठीही विहिरी किंवा बंधाऱ्याजवळ जावे लागत आहे. या समस्येबाबत ग्रामस्थांनी सभापती नमिता घारे यांच्याकडे तक्रार केली होती.

या तक्रारीची दखल घेत सभापती नमिता घारे यांनी गट विकास अधिकारी सुशांत पाटील, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी सुजित धनगर, विस्तार अधिकारी उज्वला भोसले यांच्यासह गावात भेट देत परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ तसेच महिला उपस्थित होत्या. सभापती घारे आणि गटविकास अधिकारी पाटील यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश दिले. जलजीवन मिशन योजनेच्या कामाचाही आढावा घेण्यात आला.

ही योजना लवकर पूर्ण करून गावाला नियमित पाणीपुरवठा मिळावा. यासाठी कामांना गती देण्याचे आदेश देण्यात आले. सभापती घारे यांनी येत्या काही दिवसांतच पाणीपुरवठा पूर्ववत करण्याचे आश्वासन दिले. यावेळी अनिस बुबेरे, हरिश्चंद्र वेहळे, केतन बेलोसे आदी उपस्थित होते.



# सीबीएसई दहावी परीक्षेत साळावच्या जिंदल विद्यामंदिरचा १०० टक्के निकाल



**मुरूड : प्रतिनिधी**

सीबीएसई बोर्डाच्या दहावी परीक्षेत जिंदल विद्या मंदिर, साळाव या शाळेने यंदा शंभर टक्के निकाल नोंदवत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. एकूण ६१ विद्यार्थ्यांनी परीक्षेला बसून सर्व विद्यार्थी यशस्वी ठरले, ही शाळेसाठी अभिमानाची बाब आहे.

या वर्षी दीप महेंद्र घाटवळ याने ९८% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला असून पूर्वा अमित शिवलकर (९७.८%) हिने द्वितीय तर वरद महेंद्र सातमकर (९६.८%) याने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

या यशात गौरव अमोल म्हात्रे ९०%, जान्हवी चौहान ९२.०६%, अभिलिप्सा नायक ८९.८%, आद्रिता चक्रवर्ती ९१.२%, माज नासिर पटवी ९०.०४%, मानस पिठाडिया ९४%, मुस्तफा सियामवाला ९१.०८%, नमन गुप्ता ९०.०२%, रुद्र देव वर्मा ९०.०२%, सार्थ जुईकर ९४.०२%, सोहम गीते ९२.०६%, स्वरूप म्हात्रे ९२.०६%, स्वरूप पाटील ९६.०२% आदी विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मराठी विषयात ४ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता विषयातही ४ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

विद्यार्थ्यांनी एकूणच उल्लेखनीय प्रगती करत १६ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण संपादन केले असून शाळेचा एकूण सरासरी निकाल ८०.८९% इतका राहिला आहे. एकही विद्यार्थी नापास झालेला नाही.

या यशामागे जे.ई.टी. प्रमुख डॉ. भावेश भालेराव , प्राचार्य श्री. मुकेश ठाकूर , उपप्राचार्य श्री. मंगेश बमनोटे आणि शैक्षणिक प्रबंधक अनिता बलयान यांच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजन, शैक्षणिक नेतृत्व व सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.

शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनीही या यशाबद्दल गौरवोद्गार व्यक्त केले.

# तळा तालुक्यात वाळवणे सुकविण्याकडे महिलांची लगबग

**तळा: प्रतिनिधी**



तळा तालुक्यात ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत महिला वाळवणे सुकविण्या मध्ये व्यस्त झाल्या आहेत. महिलावर्गाकडून पावसाळ्यासाठी कडधान्य, पापड, मसाल्याचे पदार्थ अंगणात, इमारतीच्या गच्चीवर आदि ठिकाणी वाळवणे उन्हात टाकून ती खडखडीत सुकवून पॅकबंद डब्यात ठेवली जात आहेत.कडधान्यांमध्ये वाल, मटकी,हरभरा,मुग,चवळी, तुरडाळ, मुगडाळ, खोबरे, इत्यादी पदार्थ पावसाळ्यात चार महिने पुरतील एवढा साठा करून ठेवतात जेणेकरून हे पदार्थ चांगले व दर्जेदार राहातील अशा पध्दतीने ठेवले जात आहेत.

काही पदार्थ तर मिठ लावून सुकवून ठेवले जात आहेत. त्यामध्ये कैऱ्यांच्या फोडी करून त्या सुकवून ठेवल्या जात आहेत. त्यातच आता ग्रामीण भागातील महिलांचे उडदाचे, तांदळाचे पापड बनविण्याचे काम ही जोरात चालू आहे.सध्या जंगलचा रानमेवा व आंबे झाले असल्याने लोणचेही भरण्याचे काम महिला वर्ग करत असल्याचे पहावयास मिळत आहे. समुद्र किनारी भागात व कोकण भागात सुकी मच्छीही चार महिने पुरेल एवढ्या प्रमाणात खडखडीत सुकवून ठेवली जाते.

त्याच बरोबर मच्छी खारवून (मिठाचा वापर करून) ठेवली जाते. परंपरेनुसार पुर्वी पासून वाळवणे घालण्याच्या पध्दतीमुळे आज महिला कामात गुंतल्या असतानादेखील वाळवणे घालून पावसाळ्यातील कडधान्याची सुविधा केली जात आहे.हे महिलांचे एक कुटुंबाचे आर्थिक बचत व नियोजन दिसत आहे.

पावसाळ्यात अनेक पदार्थ महागले जातात.त्याच बरोबर पावसाच्या पाण्याचाही त्यावर परीणाम होत असतो. सर्व बजेट बिघडण्याचा संभव असतो. या सर्व बाबींचा विचार करून महिला वर्ग पुर्वीपासूनच हे पावसाळ्यातील सर्व वस्तूंची साठवणूक करतात.हे एक कुटुंबाचे मोठे अर्थिक बजेट आदर्श आहे.मागील वर्षी पावसाळा लवकर सुरु झाल्याने त्या अनुषंगाने यावर्षी महिला लवकर वाळवणे करत असून त्यानुसार पदार्थांचा चार महिने पुरेल एवढा साठा करून ठेवत आहेत

महिलांशी संपर्क साधला असता त्या म्हणाल्या की आता उन्हाळ्यात आम्ही महीला पापड, कडधान्य, डाळी, मिरची, लोणचे, कोकमरस, इत्यादी पदार्थ वाळवण करून व वेगवेगळ्या पुर्वीपासून चालत आलेल्या पध्दतीने पावसाळ्यातील चार महिन्यांसाठी साठवण करून ठेवले जात आहेत. हे पदार्थ चांगले सुरक्षित व ताजे पुर्ण पावसाळा जाईपर्यंत राहातात. यातून चांगली अर्थिक बचत होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलानी मौजे वाजे ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|
| वाजे | काशिनाथ काथोड भगत | ८३ | ०-१५-७० ०-००-८० **एकूण ०-१६-५०** | ०.५९ |

**सदर जमिन मिळकतीपैकी ०-१०-०० गुठे जमिन मिळकतीची जाहीर नोटीस**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

ता. १७/०४/२०२६
पनवेल

**सही/-**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
१३५, नगरपालिका काम्प्लेक्स, ता.पनवेल, जि. रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे दुंदरे, तालुक पनवेल, जिल्हा रायगड**

| भूमापन क्रमांक / उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १२ | ०-२०-०० पो.ख.०-१-५० **एकूण ०-२१-५०** | २.७५ | १) वणाबाई अर्जुन दवणे, २) श्री. हनुमान गंगाराम भोपी, ३) सौ. जयश्री. पंडीत घरत, ४) सौ. चांगुणा काळुराम पाटील, ५) सौ. सुलोचना हनुमान भोपी, ६) सौ. संगीता जनार्दन सिनारे, ७) सौ. यशवंती हिरामण घरत, ८) श्री. प्रदिप काळुराम पाटील, ९) श्री. महेंद्र काळुराम पाटील, १०) श्री. संदिप काळुराम पाटील. |

**वरील एकूण मिळकत ०-२१-५० आर. चौ. मी. या मिळकतीपैकी विक्री क्षेत्र ०-१६-०० हे. आर. चौ. मी.**

पनवेल.
दिनांक : १६/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
ॲडव्होकेट
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारासमोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. 9022317772.

## पनवेल महानगरपालिका

तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड ४१०२०६

**ई-निविदा सूचना**

क्र.: पमपा/उद्यान/६६२५/प्र.क्र.०४/१२४/२०२६ — दिनांक : १७/०४/२०२६

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | दिलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील उत्सव चौकात वॉटर प्रुफिंग करणे. (द्वितीय वेळ) | PMC/Garden /10/20/ 25-26 | रु.१८,५६,४७७ (GST विरहीत) | १८५६५/- | ३ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २०/०४/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही /-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.१०६/११५/२०२६

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

**जुनी इमारत, ६ वा मजला, भूमि व मिळकत शाखा, प्लॉट क्र. सी-१४ व सी-१५, ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१,**
दुरध्वनी क्र. ०२२-६५९६-७६९४.
वेबसाईट : https://mmrda.maharashtra.gov.in
ई-मेल : ksc.ntda@mailmmrda.maharashtra.gov.in

### जाहीर प्रकटन

नगर विकास विभाग, शासन अधिसुचना क्र. टीपीएस-१२२१/२४६१/प्र.क्र.८३/२१/एनटीडीए/नवि-१२, दि.१५/१०/२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू (मुंबई पारबंदर प्रकल्प) प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रातील रायगड जिल्हयातील उरण, पनवेल व पेण तालुक्यातील १२४ गावामधील अंदाजे क्षेत्रफळ ३२३.४४ चौ.किमी क्षेत्राकरीता {ज्यामधील वन जमीनींचे क्षेत्र व किनारपट्टी विनियम क्षेत्र (Costal Regulation Zone) तसेच पेण नगरपरिषद हद्दी भोवतालचे २५० मी. परिसरातील जमीनी वगळून} महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या अनुच्छेद ११३ मधील तरतुदींनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची "नव नगर विकास प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अधिसूचीत क्षेत्रातील विकासयोग्य सर्व खाजगी जमीनींचे संपादन करण्यासाठी नगर विकास विभागाच्या दिनांक १६ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णय क्रमांक एमआरडी-३३२६/प्र.क्र.०२/नवि-७(ई-१५३०१४८) अन्वये भूसंपादन व भूवाटप धोरण निर्गमीत करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णयानुसार भूसंपादनासाठी संमती देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी पुढील प्रमाणे मान्याता देण्यात आली आहे.

१. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) “अ” अन्वये परस्पर संमतीने ठरलेल्या रकमेने कराराद्वारे किंवा भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत तत्त्वांनुसार भरपाई निश्चित करून संमतीद्वारे भूसंपादन करणे.

२. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) “ब” (अन्वये जमीन मालकाला किंवा पट्टेदाराला रोख भरपाईऐवजी चटई निर्देशांक (FSI) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क TDR) तसेच आवश्यक असल्यास सुविधांसाठी किंवा बांधकामांसाठी अतिरिक्त FSI/TDR या स्वरुपात मोबदला देवून भूसंपादन करणे.

3. सिडको महामंडळाच्या धर्तीवर भूसंपादन मोबदला म्हणून २२.५% विकसीत भूखंड देणे. सदर २२.५% विकसीत भूखंड पुढील प्रमाणे वाटप करण्यात येईल :

* उरण व पनवेल तालुक्यातील भूधारकांना २२.५% विकसीत भूखंडांचे वाटप उरण तालुक्यात करण्यात येईल.

* पेण तालुक्यातील भूधारकांना २२.५% विकसीत भूखंडांचे वाटप पेण तालुक्यात करण्यात येईल.

या जाहीर प्रकटनाद्वारे आपणास कळविण्यात येते की, नव नगर विकास प्राधिकरणामार्फत आपल्या परिसराचा विकास करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने भूसंपादन प्रक्रियेस आपण आपली संमती देऊन प्राधिकरणास सहकार्य करावे, जेणेकरून अधिसूचित क्षेत्रामध्ये नव नगराची निर्मिती करून सर्वांगीण विकास साधता येईल. आपल्या सहकार्यामुळे परिसराचा विकास अधिक जलद आणि प्रभावीपणे होऊ शकेल.

संमती पत्राचा नमुना प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आपले संमतीपत्र आपण प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर Online पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. सदरचे संमतीपत्र आपणांस दिनांक २७/०४/२०२६ पासून प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

भूसंपादनासाठी संमतीपत्र सादर करताना द्यावयाची कागदपत्रे :

1. आधार कार्ड.
2. जमीनीचा सात-बारा उतारा.
3. ८ अ उतारा.

संकेत स्थळ : http://www.mmrda.maharashtra.gov.in

**(मा. महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने)**

**(सही/-)**
**उप महानगर आयुक्त**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

दिनांक : १८/०४/२०२६

# बेलापूरमध्ये स्पाच्या नावाने अवैध धंदे

## महिलांकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय; पोलिसांची कारवाई



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर परिसरात सर्व काही नेहमीसारखंच सुरू होतं लोक आपल्या कामात व्यस्त, रस्त्यांवरची वर्दळ आणि एका स्पा सेंटरमध्ये चालणारी शांत हालचाल. बाहेरून पाहता सर्व काही व्यवस्थित वाटत असलं, तरी आत मात्र एक वेगळंच वास्तव लपलेले होते.

गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला एक गुप्त माहिती मिळाली. स्पा पॅलेस नावाच्या सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली महिलांकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याची खबर मिळताच पोलीस यंत्रणा सतर्क झाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे आणि त्यांच्या पथकाने लगेचच योजना आखली. एक बनावट ग्राहक त्या स्पा सेंटरमध्ये पाठवण्यात आला. काही वेळातच त्या ग्राहकाकडून मिळालेल्या सांकेतिक इशाऱ्याने सर्व चित्र स्पष्ट झाले आणि क्षणातच पोलिसांनी धाड टाकली.

स्पाच्या आत जे दृश्य दिसले, ते धक्कादायक होते. सात महिलांना जबरदस्तीने या धंद्यात अडकवण्यात आले होते. त्यांना मसाजच्या नावाखाली ग्राहकांसमोर उभं केलं जात होतं. या सगळ्यामागे होती स्पाची मॅनेजर नितू हजारीलाल प्रजापत. ती महिलांना कामाच्या नावाखाली आणून, त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत होती. प्रत्येक ग्राहकाकडून हजारो रुपयांचा मोबदला घेतला जात होता. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सर्व महिलांची सुटका केली आणि आरोपी मॅनेजरला अटक केली.

सुटका करण्यात आलेल्या महिलांमध्ये चार थायलंडमधील, दोन मिझोराम आणि एक मणिपूर येथील महिला असल्याचे समोर आले. या संपूर्ण कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अशा प्रकारच्या अनैतिक धंद्यांवर पोलिसांनी पुन्हा एकदा कठोर पाऊल उचलल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नारीशक्ती वंदन अधिनियमाला मनसेचा पाठिंबा

## महिला सक्षमीकरणासाठी सकारात्मक संदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये राजकीय पातळीवर एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्य महिला पदाधिकाऱ्यांनी भाजपच्या मिस्ड कॉल मोहिमेला प्रतिसाद देत नारीशक्ती वंदन अधिनियमाला पाठिंबा दर्शविला.

मनसेच्या पनवेल महानगर अध्यक्षा स्वारूपा सुर्वे, पनवेल शहर अध्यक्षा साक्षी दळवी तसेच शहर सचिव कृपया शितोळे यांनी मिस्ड कॉल देत या अधिनियमाच्या जनसमर्थनासाठी सुरू असलेल्या भाजपच्या मोहिमेत सहभाग नोंदविला. त्यांच्या या भूमिकेमुळे महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी पक्षभेद बाजूला ठेवत सकारात्मक संदेश दिला जात असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.



दरम्यान, भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, पनवेल शहराध्यक्षा रुचिता लोंढे, नगरसेविका प्रिती जॉंज आणि राजेश्री वावेकर यांनी मनसेच्या महिला पदाधिकाऱ्यांना आवाहन करत या अधिनियमाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतल्याचे चित्र दिसून आले.

या घडामोडीमुळे पनवेलमध्ये महिलांच्या राजकीय सहभाग आणि सक्षमीकरणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# अमोघ बनसोडेची आंतरराष्ट्रीय निवड



**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका शाळा क्र.१२० या शाळेचा इयत्ता दहावीतील विद्यार्थी अमोघ बनसोडे याची इंग्लड मध्ये डेव्हॉन येथे होणाऱ्या सीड्स ऑफ पीस इंटरनॅशनल कॅम्प २०२६ या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर नेतृत्व, संवादकौशल्य व शांतता प्रस्थापनेविषयी प्रशिक्षण दिले जाणार आहे.

अमोघ बनसोडे हा १८ जुलै ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत इंग्लंड येथे आयोजित आंतरराष्ट्रीय शिबिरात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. अमोघचे हे यश नवी मुंबई महानगरपालिकेसाठी अभिमानास्पद असून, त्याच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे. या कार्यक्रमासाठी देशातील १३ राज्यांमधून ३००हून अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. कठोर निवड प्रक्रियेनंतर अंतिम १७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये अमोघ बनसोडे याने स्थान मिळविले आहे.

रबाले येथे रहात असलेल्या अमोघ बनसोडेचे वडील ट्रक चालक असून त्याची आई गृहिणी आहे. त्याला दोन बहिणी असून, त्यापैकी एक इयत्ता बारावीमध्ये तर दुसरी द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. घरातील कोणीही उच्चशिक्षित नसतानाही त्याने जिद्द व मेहनतीच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महापौर सुजाता पाटील, आयुक्त डॉ.कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी संपादन केलेल्या यशाबद्दल अमोघचे अभिनंदन व कौतुक केले असून त्याला शुभेच्छा प्रदान केल्या आहेत.

अमोघच्या या यशात नमुंमपा शाळा क्र. १२० च्या मुख्याध्यापिका गोमती श्रीनिवासन, तसेच सहकारी शिक्षक यश पंत, नूरसबा शेख, रुथ अनूग्रह यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, अमोघच्या या यशामुळे नवी मुंबई महानगरपालिका शाळांचा गौरव वाढला आहे.

# ओएनजीसी उरण प्लांट येथे अग्निशमन सेवा दिन

**उरण : बातमीदार**

ओएनजीसी उरण संयंत्र येथे १४ एप्रिल २०२६ रोजी अग्निशमन सेवा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एस.एन. अहमद- जीजीएम/प्लांट मॅनेजर, ओएनजीसी उरण प्लांट, यांनी शूर शहीदांचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहिली आणि शहीदांना श्रद्धांजली वाहताना शोक शस्त्र पार पाडण्यात आले आणि २ मिनिटे मौन पाळण्यात आले.

हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सप्ताहाची औपचारिक घोषणा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आली. या वर्षासाठी ठरवलेली थीम स्पष्ट करण्यात आली. यानंतर कार्यक्रमाला उपस्थित सर्वांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश अग्निसुरक्षेचे महत्त्व वाढवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत



अग्निसुरक्षेबद्दल जागरूकता पसरवणे हा होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी शहिदांना श्रद्धांजली अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.

यावेळी राजेश कुमार आर्य, कमांडंट, सीआयएसएफ युनिट ओएनजीसी मुंबई, लोकेश चंद डेप्युटी कमांडंट फायर, सरद सोनकर सीजीएम एचएसई, हिमांशू शेखर साहू जीएम फायर सर्व्हिस, विभाग प्रमुख इन्फोकॉम, एचआर ऑपरेशन, मेंटेनन्स आणि ओएनजीसीचे इतर अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शहीद इराणा नायक वाटिकेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे एस.एन. अहमद- जी जी एम /प्लांट मॅनेजर, ओ एन जी सी उरण प्लांट, राजेश कुमार आर्य कमांडंट सीआयएसएफ युनिट ओएनजीसी मुंबई यांच्या उपस्थितीत झाला. शेवटी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अग्निशमन वाहनाला हिरवा झेंडी दाखवून अग्निशमन सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले.

# सानपाड्यात उद्या हिंदू संमेलन

**नवी मुंबई : बातमीदार**

सनातन परंपरा, संस्कृती आणि आध्यात्मिक वारसा यांचा गौरव साजरा करण्यासाठी सानपाडा येथील गुनिना मैदानावर "हिंदू संमेलन २०२६" चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. रविवारी, १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६:३० वाजता हा कार्यक्रम पार पडणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.या प्रसंगी डॉ. सुरदास प्रभु, विश्वास नांगरे पाटील, आचार्य पवन कुमार त्रिपाठी, हंसा योगेंद्र, बी.के. शीला दीदी, पियुष मेहता, महेश डी. शिंदे, ओमप्रकाश होलानी आणि संजय सिन्हा आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षपूर्ती तसेच "वंदे मातरम" या प्रेरणादायी गीताच्या १५० वर्षांच्या स्मरणाचा विशेष उल्लेख करण्यात येणार आहे. सनातन धर्माची शक्ती, एकता आणि शाश्वत ज्ञान यांचा उत्सव म्हणून या सम्मेलनाकडे पाहिले जात आहे.

कार्यक्रमात पारंपरिक हळदी-कुंकू समारंभ, दीप प्रज्वलन, "वंदे मातरम" चे सादरीकरण तसेच भक्तीमय भजन सादर करण्यात येणार आहे. "सनातन यात्रा : स्वबोध आणि प्रतिबोध" या विषयावर भव्य सांस्कृतिक नाट्यप्रस्तुती देखील सादर केली जाणार आहे.हा कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी खुला असून, कुटुंबासह सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समाजोपयोगी कार्यक्रमातून साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व दृष्टी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खांदा कॉलनी पनवेल येथे दिनांक ८ ते १४ एप्रिल या कालावधीत ७०+ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान भारत वय वंदना आरोग्य योजनेची मोफत नोंदणी करून त्यांना लॅमिनेटेड आयुष्मान वय वंदना कार्ड वाटप करण्यात आले.

१२ एप्रिल रोजी मोफत वैद्यकीय शिबिर आयोजित करून शिबिरार्थींची आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. दिनांक १३ एप्रिल रोजी मोफत रोजगार मार्गदर्शन व शासकीय विविध कर्ज अर्ज नोंदणी मेळावा घेण्यात आला. याप्रसंगी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस किशोर देवधेकर सर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामुहिक त्रिसरण, पंचशील बुद्ध वंदना घेण्यात आली यामध्ये किशोर देवधेकर सर यांनी रोजगार मार्गदर्शन केले. व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे रायगड जिल्हा व्यवस्थापक नरेंद्र साळवी यांनी शासकीय कर्ज योजनेचे मार्गदर्शन केले व प्रत्येकाला कर्ज अर्जाचे वाटप करून अर्ज भरून घेतले.

मेळाव्यास उपस्थित असलेल्यांच्या विविध समस्या व प्रश्नोत्तराचे समाधानकारक उत्तर देण्यात आले. सदर सदर कार्यक्रम आयुष्यमान किशोर देवधेकर सर अध्यक्ष दृष्टी फाउंडेशन, कार्याध्यक्ष पनवेल विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी यांच्या माध्यमातून करण्यात आले. याप्रसंगी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे रायगड जिल्हा व्यवस्थापक साळवे साहेब सागर तळे ,प्रज्ञेश, बौद्धजन पंचायत शाखा क्रमांक ७४१ चे अध्यक्ष नथुराम साखरे ,डॉक्टर सुखदेव कांबळे, दृष्टी फाउंडेशन संस्थेच्या सचिव नम्रता देवधेकर, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सदस्य,अर्जुन गवळी, पत्रकार महेंद्र मगाडे आदी प्रमुख उपस्थित होते.गरजुनी सदर मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला.

# 'केबीपी'मध्ये फुले-आंबेडकर जयंती सप्ताह

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये ८ ते १४ एप्रिल दरम्यान महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

९ एप्रिल रोजी नवी मुंबई परिसरातील विविध झोपडपट्टीमध्ये जाऊन एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांचा जीवनप्रवास व संघर्ष सांगून प्रबोधनवर्ग घेतले. १० एप्रिल रोजी जसलोक हॉस्पिटल व वाशी कॉलेज यांच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले. ११ एप्रिल रोजी सातारा येथील माहिती अधिकार कायद्याचे अभ्यासक शिवाजी राऊत यांच्या



व्याख्यानपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रो.डॉ.राजेश्री घोरपडे उपस्थित होत्या.

शिवाजी राऊत यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म एक सत्य विचार' या विषयावर अभ्यासपूर्ण व तत्त्वज्ञानात्मक स्वरूपात भाष्य केले. त्यांनी आपल्या व्याख्यानातून धर्मवाद ' धर्मचिकित्सा , कर्मकांड, नीतीवाद, सत्यवाद, ज्ञानवाद व कर्मवाद या विविध विषयावर समर्पक उदाहरणांच्या माध्यमातून मांडणी केली.

१२ एप्रिल रोजी स्वच्छता अभियान व प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. १३ एप्रिल रोजी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथांचे प्रदर्शन भरवण्यात आले. यावेळी त्यांच्या ग्रंथाचे विद्यार्थ्यांनी अभिवाचन केले. सहभागी विद्यार्थ्यांना ग्रंथभेट देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी ऐरोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला भेट दिली. आणि १४ एप्रिल रोजी डॉ. आंबेडकर जयंती साजरी करून, भारतीय संविधानाच्या उद्दिशकेचे वाचन केले. हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे एनसीसी प्रमुख प्रा. सारंग भागवत एनएसएस प्रमुख डॉ. प्रणिता भाले सांस्कृतिक प्रमुख डॉ. आबासाहेब सरवदे ग्रंथपाल प्रा. आश्विनी कांबळे यांनी प्रयत्न केले.

# उरण महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**उरण : बातमीदार**

ज्यांच्यामुळे लाखों घरांचा उद्धार झाला, माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला, महिलांना त्याचे स्वातंत्र्य व अधिकार मिळाले, दीन दुबळ्यांना जगण्याचा अधिकार मिळाला.

ज्यांनी संविधान रुपी समतेचा अधिकार दिला अशा महान थोर समाज सुधारक, भारतीय घटनेचे शिल्पकार, कायदेतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उरण महाविद्यालयात मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी वक्ते म्हणून डॉ. एच. के.जगताप, डॉ.एम.जी. लोणे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ए.के गायकवाड यांनी केले प्राचार्य डॉ.वाल्मिक गर्जे यांनी महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांचे विचार अंगीकरण्याची आवश्यकता आहे असा उपदेश उपस्थितांना दिला. तसेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली.डॉ जगताप यांनी डॉ आंबेडकर यांचे कृषी व आर्थिक धोरण विषद केले.डॉ लोणे यांनी डॉ.आंबेडकर यांची पत्रकारिता या विषयी आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्ता हिंगमिरे आणि आभार प्रदर्शन डॉ. ए.आर. कांबळे यांनी केले. आदर्श महापुरुषांचा वारसा व त्यांचे आदर्श गुण अंगीकरण्या बाबत या कार्यक्रमातून आवाहन करण्यात आले. जयंती निमित्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीही मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# 'विद्याभवन'मध्ये उन्हाळी विज्ञान शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात मराठी विज्ञान परिषद व विद्याभवन यांच्या विद्यमाने १८ व १९ एप्रिल या दोन दिवसांचे उन्हाळी विज्ञान शिबीर शाळकरी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले आहे.

खगोल शास्त्राची ओळख, समग्र आरोग्य जीवनशैली, गणितातील गमती जमती, प्रश्नमंजुषा, खेळातून विज्ञान, विज्ञान चित्रपट, कृत्रिम बुद्धिमत्ता, विज्ञान कथालेखन, कथाकथन, वैज्ञानिक दृष्टिकोन, नायट्रोजन शो, वनस्पतींची ओळख, प्रयोगातून विज्ञान संकल्पना, नागरी संरक्षण व प्रथमोपचार या विषयांवर विद्यार्थ्यांना कृतियुक्त मार्गदर्शन केले जाणार आहे.

नेहरू तारांगणचे संचालक डॉ. अरविंद परांजपे, डॉ. नीलिमा जोशी, संगीता सराफ, शशिकांत धारणे, डॉ. पूनम हुद्दार, गौरी देशपांडे, डॉ. मानसी राजाध्यक्ष, विनय दिनकर, अल्पना कुलकर्णी, डॉ. सुरेश भागवत, सुनील सुळे, पद्मश्री डॉ. शरद काळे या विज्ञान क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन या शिबिरातील विद्यार्थ्यांना लाभणार आहे. माध्यमिक स्तरावरील अनेक विद्यार्थ्यांनी या शिबिरासाठी नोंदणी केली आहे. पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ आणि नवी मुंबई मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. किशोर कुलकर्णी यांनी या शिबिराचे नियोजन केले आहे.

# गोखले एज्युकेशन सोसायटीत संयुक्त जयंती उत्सव

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली गोखले एज्युकेशन सोसायटीच्या विधी महाविद्यालयात बुधवारी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रुती जाधव व प्राध्यापिका संजना रमन यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी प्राचार्या डॉ. श्रुती जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षण आणि विधवा पुनर्विवाह या क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव केला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाद्वारे दिलेले मूलभूत हक्क केवळ पुस्तकात मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणावेत,



असा संदेश विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांनी शोषित, पीडित आणि महिलांच्या मुक्तीसाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. समता, शिक्षण आणि सामाजिक क्रांतीचे विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे त्यांचे योगदान आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला प्राध्यापिका पूजा चव्हाण, प्राध्यापिका साक्षी झांटये तसेच प्राध्यापक सिंग सर ग्रंथालय संचालिका दिप्ती भिसे शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे प्रस्तावना व सूत्रसंचालन विद्यार्थीनी अर्चना पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन सय्यद जाफर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम' या गीताने करण्यात आली.

### माझं गाव आरोग्यसंपन्न गाव अभियान

# रायगड जिल्हा परिषदेतर्फे कार्यशाळा





**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित माझं गाव आरोग्यसंपन्न गाव या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी व वैद्यकीय अधिकार्‍यांची कार्यशाळा गुरुवारी वरसोली येथील सभागृहात पार पडली.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी (आरोग्य विभाग) रेश्मा संकपाळ, बहुतांश तालुक्यांचे आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी, वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी मार्गदर्शन करताना, रायगड जिल्ह्याचे नाव संपूर्ण राज्यात अग्रगण्य राहील यासाठी आपण प्रयत्न करू. प्रत्येक कर्मचारी, अधिकारी यांनी अभियानात हिरीरीने सहभाग घेत हे अभियान यशस्वी करूया, असे सांगून सर्वांना शुभेच्छा दिल्या.

उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी, कोविड काळात आरोग्य विभागाने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याचप्रमाणे या अभियानांतर्गत आपल्याला काम करायचे आहे. आपल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा साठा पुरेपूर असणे गरजेचे आहे. जे अधिकारी कामचुकारपणा करत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. या अभियानांतर्गत सर्वांनी मनापासून काम केले तर आपल्याच गावचा विकास होणार आहे. यासाठी आपण एकत्र काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी, मिशन मोडमध्ये आपल्याला हे अभियान राबवायचे आहे. संपूर्ण वर्ष अभियान असल्याने वर्षभरात संपूर्ण गावाने एकत्र येऊन काम करायचे आहे. यासाठी आपण सर्वच प्रयत्न करू, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी अभियान राबविण्याबाबत सविस्तर माहिती दिली. संपुर्ण गावाने एकत्र येत आपले गाव आरोग्यसंपन्न करायचे आहे. यासाठी विविध स्तरावर सर्वसमावेशक कृती दल स्थापन करून जनजागृती, आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यशाळेमध्ये अभियानाची माहिती सविस्तर माहिती देण्यात आली. समिती नेमून मार्गदर्शक सूचनांबाबत सांगण्यात आले. त्याचप्रमाणे इतर समस्या, रुग्णालयांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. वैद्यकीय अधिकारी संघटनेतर्फे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर व उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

**तळा : दिवसा कडक ऊन पडत असताना सकाळी मात्र हवेत चक्क गारवा व सभोवताली धुके धुके पहावयास मिळाले. आगरदांडा-इंदापूर रस्त्यावर तळा भागात मोठ्या प्रमाणात सकाळी धुक्याचे ढग पहावयास मिळाले, ते चित्र संजय करडे यांनी कॅमेर्‍यात टिपले आहे.**



## महुरे-महागाव फाट्यादरम्यान खड्डे

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील एक महत्त्वाचा विभाग महागाव आहे. या विभागातील गावांकडे जाणार्‍या महुरे -बारपे- महागाव (बहुलेवाडी) फाट्यापर्यतच्या रस्त्याची धुळधाण उडाली आहे.

या मार्गावरून रोहो तसेच तळा व इंदापूरकडेही जाता येत असल्याने प्रवाशांची व वाहनांची वर्दळ असते. खड्ड्यांमुळे वाहन चालवताना चालकांना कसरत करावी लागत आहे. पावसाळ्यापूर्वी याची डागडुजी करण्याची मागणी प्रवासी, विद्यार्थी, नागरिक व वाहनचालकांकडून होत आहे.

# अंशुल कंपनीतील कामगारांचा विविध मागण्यांसाठी संप

### व्यवस्थापनाने कामगारहिताचा निर्णय घ्यावा -अमित घाग



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्रातील 'अशुल युनिट टू' या कारखान्यातील कामगारांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी पुकारलेला बेमुदत संप सातव्या दिवशीही सुरू असून परिसरात तणावपूर्ण वातावरण कायम आहे. सध्या एकूण २० कामगार आंदोलनस्थळी ठिय्या देऊन बसले आहेत.

सदर आंदोलन धर्मराज कामगार कर्मचारी महासंघ (युनियन) यांच्या नेतृत्वाखाली सुरू असून कामगारांच्या म्हणण्यानुसार कंपनी प्रशासनाकडून गेल्या अनेक दिवसांपासून अन्यायकारक वागणूक दिली जात आहे. त्यांच्या मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष होत असून या संदर्भात युनियनमार्फत अनेक वेळा चर्चा करूनही कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. उलट कंपनीकडून एकतर्फी निर्णय घेतले जात असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.

दरम्यान, १३ मार्च २०२६ रोजी युनियनने कायदेशीर बेमुदत संपाबाबत कंपनी प्रशासनाला नोटीस दिली होती. त्यानंतर काही मुद्द्यांवर चर्चा झाली, मात्र दोन बैठकींनंतरही कामगारांच्या मुख्य मागण्यांवर कोणताही सकारात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही. २७ मार्च रोजी संपाचा इशारा देण्यात आला होता, पण कंपनी चर्चेला बसेल या आशेने कामगारांनी व युनियनने १५ दिवसांची मुदत दिली. तरीही कोणतीही कार्यवाही न झाल्याने अखेर ९ एप्रिल रोजी संपाचा निर्णय घेण्यात आला आणि १० एप्रिलपासून हा संप सुरू करण्यात आला.

कामगारांच्या प्रमुख मागण्यांमध्ये किमान वेतनात वाढ व १० टक्के वाढ लागू करणे, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, शिक्षण भत्ता, कँटीन सुविधा, वैद्यकीय भत्ता तसेच शिफ्ट भत्ता देण्याचा समावेश आहे. या आंदोलनाला विविध स्तरांतून पाठिंबा मिळत आहे.

धर्मराज कामगार कर्मचारी महासंघाचे जिल्हा व राज्य पदाधिकारी यांनी आंदोलनस्थळी भेट देत कामगारांशी संवाद साधला तसेच पंचायत समिती सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर यांनीही भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. त्यांच्या समवेत रोठ बुद्रुकचे माजी सरपंच ज्ञानेश्वर साळुंखे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

याशिवाय भारतीय जनता पक्षाचे रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांनीही आंदोलनस्थळी भेट देत कामगारांच्या लढ्याला पाठिंबा दिला तसेच अंशुल कंपनीतील कामगारांनी उभारलेला पगारवाढीचा लढा योग्य असून भारतीय जनता पक्ष सदैव त्यांच्या पाठीशी आहे. धाटाव एमआयडीसीतील कोणत्याही कामगारावर अन्याय झाला, तर तो सहन केला जाणार नाही. कंपनीने तत्काळ कामगारांच्या हिताचा निर्णय घ्यावा, अशी मागणी अमित घाग यांनी केली.

यावेळी भाजपा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक रोशन चाफेकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष नरेश कोकरे, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, निलेश जंगम आदी उपस्थित होते.

## रायगडात उष्णतेचा पारा चढला

### खबरदारी घेण्याचे आरोग्य विभागाकडून आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे रायगड जिल्ह्यातील नागरिक हैराण झाले आहेत. पुढील तीन-चार दिवसांत उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. या काळात तापमान सरासरीपेक्षा खूप जास्त राहण्याची शक्यता असल्याने आरोग्य विभागाकडून खबरदारीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कोणत्याही व्यक्तीने (उघड्या आकाशाखाली) बाहेर जाऊ नये, कारण हवामान विभागाने सांगितले आहे की तापमान ४५ ते ५५ सेल्सिअसपर्यंत जाऊ शकते. त्यामुळे जर कोणाला घुसमटल्यासारखे वाटले किंवा अचानक तब्येत बिघडली तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. घरातील दरवाजे उघडे ठेवा, जेणेकरून वायुविजन होईल. मोबाईलचा वापर कमी करा, मोबाईल फुटण्याची शक्यता असू शकते. कृपया सावध रहा आणि इतरांना माहिती द्या. शक्यतो दही, ताक, बेलफळाचा रस इत्यादी थंड पेयांचा वापर करा, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

**अशी घ्या काळजी**

पुरेसे पाणी आणि द्रवपदार्थ प्या. गॅस सिलिंडर उन्हात ठेवू नका. वीजमीटरवर जास्त भार टाकू नका. घरातील वापरात असलेल्या भागातच एसी वापरा, विशेषतः उन्हाळ्यात. दोन ते तीन तासांनी ३० मिनिटे विश्रांती घ्या. बाहेर तापमान ४५ ते ४७ अंश सेल्सियस असताना घरातील एसी २४-२५ सेल्यियसवर ठेवा, त्यामुळे आरोग्य चांगले राहील. विशेषतः सकाळी १० ते दुपारी ३ दरम्यान थेट सूर्यप्रकाश टाळा.

# घनकचरा प्रकल्पाच्या दुर्गंधीविरोधात गोंडाळे ग्रामस्थांची महाड पालिकेवर धडक

### १०-१५ दिवसांत तोडगा काढण्याचे नगराध्यक्षांचे आश्वासन



**महाड : प्रतिनिधी**

महाड शहराजवळील लाडवली येथे महाड नगर परिषदेच्या माध्यमातून सुरू असलेल्या घनकचरा निर्मूलन प्रकल्पातून येणार्‍या तीव्र दुर्गंधीमुळे गोंडाळे ग्रामस्थांनी गुरुवारी थेट नगर परिषद कार्यालयावर धडक देत प्रशासनाला जाब विचारला. दुर्गंधीमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

गेल्या काही दिवसांपासून प्रकल्पातील कचर्‍याच्या विघटन प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असून परिसरातील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिक यांना विशेषतः याचा फटका बसत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या संदर्भात प्रशासनाशी वारंवार पत्रव्यवहार करूनही ठोस कारवाई न झाल्याने अखेर नगर परिषद कार्यालयावर धडक देण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रकल्पामुळे गावाशेजारील नदीचे पाणी दूषित होत असून जलचर तसेच पशुपक्ष्यांवरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. त्यामुळे दुर्गंधीवर तत्काळ नियंत्रण आणावे, अन्यथा प्रकल्प गाववस्तीपासून दूर हलवावा, अशी मागणी करण्यात आली.

नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांनी ग्रामस्थांची बाजू ऐकून घेत संबंधित अधिकार्‍यांशी चर्चा केली. पुढील १० ते १५ दिवसांत या प्रश्नावर तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले तसेच मागील काही वर्षांत प्रशासकीय राजवट असल्याने प्रकल्पाच्या देखरेखीत काही त्रुटी राहिल्याचे त्यांनी मान्य केले. आता लोकप्रतिनिधींचे शासन कार्यरत झाल्याने नियोजनबद्ध पद्धतीने समस्या सोडविण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामस्थांचा वाढता विरोध लक्षात घेता प्रकल्प स्थलांतरित करण्याबाबत शासकीय स्तरावर प्रस्ताव मांडला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

## पालव फाट्याजवळ अपघातात दोघे जखमी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग-रेवदंडा मार्गावर पालव फाट्याजवळ वळणावर भरधाव पीकअप टेम्पोने मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात दोघे जखमी झाले आहेत. हा अपघात दि. १४ एप्रिल रोजी रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास घडला.

मिळालेल्या माहितीनुसार स्वप्नील जयवंत कवळे (वय ३४, रा. नागाव) आणि सर्वेश सुभाष पाटील (वय २७, रा. वरंडे) हे दोघे स्प्लेंडर मोटरसायकल (एमएच ०६ सीबी ५५८०)वरून नागावकडून रेवदंडा दिशेने जात होते. बागमळा परिसरात पेट्रोल भरण्यासाठी जात असताना पालव फाट्याच्या पुढील वळणावर समोरून येणार्‍या पीकअप टेम्पो (एमएच ०६ जेयू ५६६४)ने भरधाव वेगात व निष्काळजीपणे रॉंग साईडने येत मोटरसायकलला जोरदार धडक दिली.

या धडकेत मोटरसायकलवरील दोघे खाली पडले. यातील स्वप्नील कवळे यांना उजव्या पायाला दुखापत झाली असून सर्वेश पाटील यांना उजव्या हात व मांडीला दुखापत झाली आहे. अपघातात पीकअप टेम्पोचालक किशोर काशिनाथ पाटील (वय ४५, रा. सातपूर, नाशिक) यालाही किरकोळ दुखापत झाली आहे.

या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताचा अधिक तपास पोलीस अधिकारी आर.के. थळे करीत आहेत.

# विविध स्पर्धा परीक्षांमध्ये ठाणेन्हावे मराठी शाळेचे यश

**चौक : प्रतिनिधी**

प्राथमिक शाळेतील विद्यार्थी यांच्यासाठी मंथन ही राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा झाली. त्यात रायगड जिल्हा परिषद ठाणेन्हावे प्राथमिक मराठी शाळेने घवघवीत यश संपादन केल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे.

या परीक्षेमध्ये राज प्रवीण बोर्ले याने इयत्ता तिसरीमध्ये तालुकास्तरावर प्रथम क्रमांक, तर सार्थक संतोष खाडे यांनी तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवत यश संपादन केले आहे. तालुकास्तरीय गणित व इंग्रजी बौद्धिक स्पर्धांमध्येही शाळेतील विद्यार्थ्यांनी आपली कामगिरीची चुणूक दाखवली आहे. अनुज नितीन सकपाळ (इयत्ता सातवी) याने गणित विषयात प्रथम क्रमांक, कौस्तुभ गणेश तावडे (इयत्ता सातवी) याने इंग्रजी विषयात तृतीय क्रमांक, इयत्ता सहावीतील सई सुधाकर कदम हिने इंग्रजी विषयात द्वितीय क्रमांक व हिमेश जनार्दन पाटीलने गणित विषयात द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

शाळेने मिळवलेल्या या यशाबद्दल खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, उपसभापती भाई शिंदे, गटविकास अधिकारी संदीप कराड, गटशिक्षण अधिकारी सौ.परब, ग्रामपंचायत ठाणेन्हावे, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ यांनी विद्यार्थी व शिक्षक यांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## कर्जतमध्ये रोग निदान शिबिर



**कर्जत : प्रतिनिधी**

स्व. अजित निगुडकर यांच्या स्मरणार्थ ऋषभ मार्केट कर्जत यांनी माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, केएमटी आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या नाक, कान, घसा मोफत शिबिरात १०२ रुग्णांची तपासणी केली.

ऋषभ मार्केटच्या प्रांगणात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. सुनीता मगर यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उदघाट्न झाले. यावेळी ॲड. राजेंद्र निगुडकर, जितेंद्र ओसवाल, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे, प्रदीप गोगटे, पांडुरंग देशमुख, सारिका ओसवाल, उत्तम पायघुडे, रौनक ओसवाल आदी उपस्थित होते.

जितेंद्र ओसवाल यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात, स्व. अजित निगुडकर हे एक अतिशय प्रामाणिक होते. ते आमचे केवळ कर्मचारी नव्हते, तर कुटुंबातील एक सदस्य होते. त्यांच्या जाण्याने आम्हाला खूप दुःख होत आहे. त्यांची स्मृती कायम रहावी म्हणून हा उपक्रम सुरु केला आहे, असे स्पष्ट केले. ॲड. निगुडकर यांनी, एखादा मालक आपल्या कर्मचार्‍याचे स्मरण कायम रहावे यासाठी करीत असलेला हा समारंभ कर्जतमध्ये प्रथमच होत आहे. डॉ. मगर यांनी आम्ही असे उपक्रम नेहमी करणार आहोत. त्यासाठी आपले सहकार्य मोलाचे आहे. पुढील शिबीर पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठामध्ये आयोजित करण्याची संधी द्यावी, असे सूचित केले.

यावेळी डॉ. भाग्यश्री तेलगोटे, डॉ. रश्मी देओल, डॉ. शशी मोकल, डॉ. हुझयफा शेख, डॉ. स्नेहल खिरोडकर आदींनी रुग्णांची तपासणी करण्यात आली. नगरसेवक ॲड. रोहित ओसवाल, रणजीत जैन, प्रकाश ओसवाल, योगेश देशमुख, यश सुर्वे, पद्मजा देशमुख आदी उपस्थित होते.

# मुरूडमध्ये डॉ. आंबेडकर जयंती साजरी

### विविध कार्यक्रम; महामानवाला विनम्र अभिवादन



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका बौद्ध समाज सेवा संघ संस्थे कडून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५वी जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

मुरुड तालुका बौद्ध समाज सेवा संघ केंद्रीय समिती, स्थानिक तालुका समिती, विभागीय शाखा १,२,३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, धम्म संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ६० वर्षांपासून जयंती साजरी होत असते, परंतु या वर्षी प्रथमच अनेक वर्षांच्या प्रतीक्षेत असलेले बौद्ध समाज डॉ.बाबासाहेब आंबेडकर संस्थेच्या इमारतीत जयंती साजरी करताना भीमसैनिकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला.

जयंतीनिमित्त भव्य रथातून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याला अभिवादन करून मुरुड शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

प्रमुख व्याख्याते ॲड . सुमित भालेराव यांचे आधुनिक भारत निर्मिती मध्ये डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन झाले. डॉ. बाबासाहेबांच्या भारत विकासाच्या द्रष्टेपणा, अर्थशास्त्रीय दृष्टीकोन,भारतीय संविधान, स्वातंत्र्य, समता व बंधूता आदी आयामांवर प्रकाश टाकत बाबासाहेबांचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणले पाहिजेत, असे आग्रही प्रतिपादन ॲड. भालेराव यांनी केले.

या प्रसंगी व्यासपीठावर मुरुड तालुका बौद्ध सेवा संघ अध्यक्ष किशोर शिंदे, उपाध्यक्ष रघुनाथ कांबळे, स्थानिक तालुका समिती अध्यक्ष सुरेश मोरे, सचिव धर्मेश मोरे, माधुरी भालेराव, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, स्मारक समिती सचिव मंगेश येलवे, ॲड. बबन शिंदे, दीपक शिंदे आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात किशोर शिंदे यांनी बाबासाहेबांच्या प्रस्तावित स्मारकाचे ५० वर्षांचे स्वप्न साकार केल्याबद्दल आमदार महेंद्र दळवी यांचे आभार व्यक्त केले. रात्री स्थानिक कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम तसेच ओंकार काटले प्रस्तुत प्रबोधनात्मक कार्यक्रम मैफल सप्तसुरांची हा बहारदार ऑर्केस्ट्रा सादर झाला.

# पंजाबचा विजयी चौकार

## मुंबई इंडियन्सचा धुव्वा; प्रभसिमरन-श्रेयसची अर्धशतके

**मुंबई : प्रतिनिधी**

अनुभवी क्विंटन डी कॉकच्या तडफदार शतकानंतरही मुंबई इंडियन्सला गुरुवारी आयपीएल साखळी सामन्यात पंजाब किंग्जविरुद्ध सात गड्यांनी नामुष्कीजनक पराभवाचा सामना करावा लागला. एकीकडे पंजाबसाठी हा पाच सामन्यांतील चौथा विजय ठरला, तर दुसरीकडे मुंबईसाठी पाच सामन्यांतील चौथा पराभव ठरला. या लढतीत मुंबईने २० षटकांत ६ बाद १९५ धावांचा डोंगर रचला, मात्र पंजाबनेही तोडीस तोड प्रत्युत्तर देत १६.३ षटकांतच तीन बाद १९८ धावांसह विजयाचे लक्ष्य गाठले.

विजयासाठी १९६ धावांचा पाठलाग करताना पंजाबतर्फे प्रभसिमरन सिंगने ३९ चेंडूंत ८० धावांचा झंझावात साकारला, तर कर्णधार श्रेयस अय्यरने ३५ चेंडूंत ६६ धावा फटकावत सर्व अडसर सहजपणे दूर सारले. प्रभसिमरनच्या खेळीत ११ चौकार व दोन षटकार, तर श्रेयसच्या खेळीत पाच चौकार व चार षटकारांचा समावेश राहिला. प्रियांश आर्य १५, कूपर कोनोली १७ स्वस्तात बाद झाले असले, तरी प्रभसिमरन व श्रेयसच्या तडफदार अर्धशतकांमुळे पंजाबला विजयासाठी फारसे वेगळे प्रयास करावे लागले नाहीत. मुंबईचा स्टार स्पीडस्टार जसप्रीत बुमराहची विकेटची पाटी या सामन्यातही कोरीच राहिली.



त्याला चार षटकांत ४१ धावा मोजाव्या लागत असताना अगदी एकही बळी घेता आला नाही.

प्रारंभी अनुभवी क्विंटन डी कॉकच्या झंझावाती शतकाने वानखेडे स्टेडियमवर धावांचा पाऊस पाडला. अवघ्या ६० चेंडूंत ११२ धावांची नाबाद खेळी करणाऱ्या डी कॉकने आठ चौकार, सात उत्तुंग षटकार खेचले. नमन धीरने (३१ चेंडूंत ५० धावा) त्याला मोलाची साथ दिली, मात्र तो बाद होताच मुंबईचा डाव पुन्हा अडखळला. मुंबईची मधली फळी पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळली आणि यामुळे त्यांना २०० पार जाण्याची संधी असतानाही १९५ धावांवर समाधान मानावे लागले.

# टी-२० वर्ल्डकपच्या सामन्यात झाली मॅच फिक्सिंग?

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) आपल्या भ्रष्टाचार विरोधी नियमांच्या अंमलबजावणीबाबत अत्यंत कठोर झाली आहे. कॅनडा क्रिकेट संघाचा कर्णधार दिलप्रीत बाजवा याच्यावर संशयास्पद हालचाली आणि फिक्सिंगमध्ये सहभाग असल्याच्या आरोपावरून चौकशीचा फास आवळला गेला आहे.

आयसीसीच्या भ्रष्टाचारविरोधी पथकाने क्रिकेट कॅनडाशी संबंधित भ्रष्टाचार, संघ निवडीतील हस्तक्षेप आणि मॅच-फिक्सिंगच्या गंभीर आरोपांची चौकशी सुरू केली आहे. ईएसपीएनक्रिकइन्फोच्या वृत्तानुसार या चौकशीचा मोठा भाग १७ फेब्रुवारी २०२६ रोजी चेन्नईतील एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर कॅनडा आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या टी-२० विश्वचषक सामन्याशी संबंधित आहे, ज्यात न्यूझीलंडने आठ गडी राखून विजय मिळवला होता. त्या



सामन्यात कॅनडाचा कर्णधार दिलप्रीत बाजवाने टाकलेल्या एका षटकावर संशय व्यक्त करण्यात आला आहे.

न्यूझीलंडच्या डावातील पाचवे षटक टाकण्यासाठी दिलप्रीत गोलंदाजीला आला होता. त्यावेळी न्यूझीलंडची धावसंख्या ३५ धावांवर दोन गडी बाद अशी होती. कॅनडाने सुरुवातीची षटके वेगवान गोलंदाजांकडून टाकली होती, पण नंतर फिरकी गोलंदाजीचा आधार घेतला. दिलप्रीत बाजवाने आपल्या षटकाची सुरुवात नो-बॉलने केली आणि त्यानंतर वाईड चेंडू टाकला. त्या षटकात बाजवाने १५ धावा दिल्या. या षटकावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून त्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

### बुकींशी संपर्क झाल्याचा संशय

आयसीसीच्या भ्रष्टाचार विरोधी पथकाला दिलप्रीत बाजवाच्या अलीकडील काही व्यवहारांबाबत आणि संपर्काबाबत संशयास्पद माहिती मिळाली आहे. विशेषतः त्याचा काही टी-२० लीग्स आणि आंतरराष्ट्रीय सामन्यांदरम्यान बुकींशी संपर्क झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत दिलप्रीतवर तात्पुरती बंदी घातली जाण्याची शक्यता आहे. आयसीसीने अद्याप अधिकृतपणे त्याच्या निलंबनाची घोषणा केलेली नाही, पण त्याला चौकशीत पूर्ण सहकार्य करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## पंजाब संघाने वानखेडे स्टेडियमवर इतिहास रचला

### मुंबईविरुद्ध सर्वाधिक सामना जिंकणारा ठरला संघ

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६च्या २४व्या सामन्यात पंजाब किंग्जने मुंबई इंडियन्सचा सात गडी राखून पराभव केला. या विजयासह पंजाबच्या संघाने इतिहासाला गवसणी घातली. विशेष म्हणजे, आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सविरुद्धपंजाब किंग्सचा हा १८वा विजय ठरला आहे. शिवाय, आयपीएलमध्ये वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्ध सर्वाधिक सामने जिंकणारा संघ आता पंजाब किंग्ज बनला आहे.

आयपीएलमध्ये वानखेडे स्टेडियमवर एमआयविरुद्ध सर्वाधिक सामने जिंकण्याचा विक्रम आता पंजाब किंग्जच्या नावावर जमा झाला आहे. या मैदानावर पंजाबने खेळलेल्या ११ सामन्यांपैकी सहा सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्सचा पराभव केला. या तुलनेत चेन्नई सुपर किंग्सने या मैदानावर खेळलेल्या १३ सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्सला पाच वेळा हरवले आहे. आरसीबीनेदेखील या मैदानावर हा पराक्रम पाच वेळा केला आहे. दरम्यान, राजस्थान रॉयल्स संघाने या स्टेडियमवर खेळलेल्या नऊ सामन्यांमध्ये मुंबईचा चार वेळा पराभव केला आहे.

आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सविरुद्ध एकूण सर्वाधिक विजय मिळवणाऱ्या संघांचा विचार करता पंजाब किंग्सने आता चेन्नई सुपर किंग्सच्या विक्रमाशी बरोबरी केली. आजवर पंजाब आणि चेन्नई या दोन्ही संघांनी मुंबईचा प्रत्येकी १८ वेळा पराभव केला. पंजाबने हा पराक्रम ३५ सामन्यांत, तर चेन्नईने ३९ सामन्यांत साध्य केला.


### राज्यस्तरीय व्यावसायिक पुरुष गट कबड्डी स्पर्धा

## युवा पलटन, ठाणे महानगरपालिका, भारत पेट्रोलियम, मुंबई पोस्टल संघ उपांत्य फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

युवा पलटन, ठाणे महानगरपालिका, भारत पेट्रोलियम, मुंबई पोस्टल यांनी ओम् ज्ञानदीप मंडळाने आयोजित केलेल्या या हंगामातील पहिल्या पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक दिली. युवा पलटन वि. ठाणे महानगर पालिका, भारत पेट्रोलियम वि. मुंबई पोस्टल अशा प्रथम उपांत्य लढती होतील. त्यानंतर अंतिम सामना होईल.

मुंबई आदर्श नगर येथील वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावरील स्व. अमित वजराटकर क्रीडानगरीतील मॅटवर झालेल्या पहिल्या उपांत्यपूर्व फेरीत युवा पलटन संघाने मीरा भाईंदर महानगरपालिकेचा ४४-२३ असा पाडाव केला. आक्रमक खेळ करीत पूर्वार्धात दोन लोण देत युवा पलटनने २७-१० अशी भक्कम आघाडी घेतली. उत्तरार्धात सावध खेळ करीत आणखी एक लोण देत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब



केले. असलम इनामदार, अलंकार पाटील यांच्या तुफानी चढायांना अथर्व धुमाळ, अजय कुमार यांची मिळालेली बचावाची भक्कम साथ यामुळे हे शक्य झाले.

ठाणे महापालिकेने मुंबई बंदर संघाचा प्रतिकार ३२-२२ असा मोडून काढला. सुरवातीला चुरशीने खेळल्या गेलेल्या या सामन्यात विश्रांतीला १५-१२ अशी नाममात्र आघाडी ठाण्याकडे होती. विश्रांतीनंतर ठाणेकरांनी आपला खेळ उंचावत मुंबई बंदरवर लोण देत विजयाच्या दिशेने कूच केली. त्यागराज कुंभार, जावेद पठाण, परेश म्हात्रे यांच्या संयमी खेळाला याचे श्रेय जाते.

भारत पेट्रोलियमने पुण्याच्या डीपीयुचा ३९-२५ असा पाडाव केला. मध्यंतराला २३-१८ अशी आघाडी पेट्रोलियम संघाकडे होती. अनिल जस्ता, आदित्य चौघुले, हर्ष लाड, प्रदीप दिघोळ भारत पेट्रोलियमकडून, तर विकास जाधव, राहुल वाघमारे, हर्षद माने डीपीयुकडून उत्कृष्ट खेळले. शेवटच्या सामन्यात मुंबई पोस्टलने मिडलाईन अकॅडमीवर ५१-४६ अशी मात केली. अभिराज पवार, अभिषेक भोजने यांच्या चढायांना ओमकार मोरेची मिळालेली पकडीची साथ यामुळे पोस्टलने पहिल्या डावात दोन लोण देत २८-१८ अशी आघाडी घेतली होती. दुसऱ्या डावात सुशील काबरेकर, साईप्रसाद यांनी आपला खेळ उंचावत दोन लोण देत खेळ रंगतदार अवस्थेत आणला, पण उत्तरार्धात आणखी एक लोण देत पोस्टलने आपला विजय निश्चित केला.

## क्विंटन डी कॉकचा शतकासह मोठा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सने पंजाब किंग्सविरूद्धचा सामना गमावला असला तरी या सामन्यात मुंबईसाठी एक गोष्ट चांगली ठरली. ती क्विंटन डी कॉकचे शतक. रोहित शर्माच्या अनुपस्थितीचा मुंबई इंडियन्सला मोठा धक्का बसला असला तरी त्याच्या जागी संघात घेतलेल्या डी कॉकने मात्र शतक झळकावत ११२ धावांची उत्कृष्ट खेळी केली. या शतकासह त्याने मोठा विक्रम रचला आहे.

आयपीएल लिलावात मुंबई इंडियन्स व्यतिरिक्त इतर कोणत्याही संघाने डी कॉकवर बोली लावली नव्हती. मुंबईने एक कोटींना संघात घेतलेल्या क्विंटनने मात्र यंदाच्या पहिल्याच सामन्यात शतक झळकावले. मागील चार सामन्यांमधून बाहेर बसलेल्या खेळाडूने आता आयपीएल २०२६मध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. डी कॉकने अवघ्या ५३ चेंडूंमध्ये सात षटकार आणि सात चौकारांच्या जोरावर आपले शतक पूर्ण केले. यंदाच्या आयपीएलमधील हे डी कॉकचे पहिले आणि त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील तिसरे शतक आहे. त्याने ६० चेंडूंमध्ये नाबाद ११२ धावा केल्या.

क्विंटन डी कॉकने पंजाब किंग्सविरुद्ध शतक झळकावून एक मोठा विक्रमही आपल्या नावे केला आहे. आयपीएलमध्ये तीन वेगवेगळ्या संघांसाठी शतके झळकावणारा डी कॉक हा पहिला विदेशी खेळाडू ठरला आहे. त्याने दिल्ली डेअरडेव्हिल्स, लखनऊ सुपरजायंट्स आणि आता मुंबई इंडियन्सकडून खेळताना शतके झळकावली आहेत. या हंगामाच्या आयपीएल लिलावात मुंबईने डी कॉकला एक कोटींच्या मूळ किमतीत खरेदी केले.

## राज्यस्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धा

### ओम् वर्तकनगर, अश्वमेघ स्पोर्ट्स संघ चौथ्या फेरीत दाखल



**ठाणे : प्रतिनिधी**

जय भारत स्पोर्ट्स, स्वराज्य स्पोर्ट्स, मिड लाईन यांनी महिलात श्री मावळी मंडळाने आयोजित केलेल्या ७३व्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत तिसरी फेरी, तर ओम् वर्तकनगरने चौथी फेरी गाठली. पुरुषांत शिवमुद्रा प्रतिष्ठान, श्रीराम विश्वस्त, जय बजरंग-वाशिंद, मिडलाईन यांनी चौथ्या फेरीत प्रवेश केला.

अश्वमेघ संघाला मात्र चौथी फेरी गाठण्यासाठी ५-५ चढाईच्या डावापर्यंत लढत द्यावी लागली. ठाणे चरई येथील श्री मावळी मंडळाच्या भव्य पटांगणावर सुरू असलेल्या तिसऱ्या दिवशी पुरुष गटात ठाण्याच्या अश्वमेघ संघाने ५-५ चढायांत बाळ गोपाळ मंडळाचा प्रतिकार ३३-३२(७-६) असा मोडून काढत आगेकूच केली. पूर्वार्धात १३-१५ अशा पिछाडीवर पडलेल्या अश्वमेघने पूर्ण डावात २६-२६ अशी बरोबरी साधली. नंतर ५-५ चढायात ७-६ अशी बाजी मारली.

अश्वमेघच्या आदित्य पांडेने ५-५ चढायातील आपल्या दुसऱ्या चढाईत तीन गडी टिपत संघाचा विजय निश्चित केला. त्याला गणेश रणनवरे, हर्षल शिंदे, शुभम पांडे यांची उत्तम साथ लाभली. बाळ गोपाळच्या पंकज फाटक, अमित शहा, दिपू तिवारी यांचा जोश ५-५ चढाईत किंचितसा कमी पडला. शिवमुद्रा प्रतिष्ठानने मध्यंतरातील १६-१७ अशा पिछाडीवरून गुड मॉर्निंग स्पोर्ट्सचा संघर्ष ३७-२७ असा संपविला. विशाल लाड, राकेश घाडी, अनिकेत सोनुले यांच्या चढाई पकडीच्या खेळाने शिवमुद्राने हा विजय साकारला. सुरज दळवी, आयुष पवार यांचा खेळ उत्तरार्धात ढेपाळला.

श्रीराम विश्वस्त संघाने पहिल्या डावातील १६-२३ अशा सात गुणांच्या पिछाडीवरुन श्री विठ्ठल मंडळाचा विरोध ४१-३८ असा संपुष्टात आणला. अक्षय मकवाना, चिन्मय गुरव, सिद्धेश पाणीचाळ यांच्या चतुरस्त्र खेळाने पहिल्या डावात श्री विठ्ठल संघाला आघाडी मिळवून दिली होती, पण ती त्यांना टिकविता आली नाही. श्रीरामच्या तुषार शिंदे, हर्ष काळे, आदित्य पात यांनी टॉप गिअर टाकत विरुद्ध संघावर दोन लोण देत तीन गुणांनी बाजी पलटविली.

जय बजरंग वाशिंद संघाने वीर परशुराम संघावर २८-२१ अशी मॅट केली. विराज शिंदे, आशिष पाटील यांच्या चढाई पकडीच्या उत्कृष्ट खेळाला या विजयाचे श्रेय जाते. महिलांत ओम् वर्तकनगरने अमर हिंद मंडळाला ४२-२४ अशी मात करीत चौथी फेरी गाठली. आक्रमक सुरुवात करीत पूर्वार्धात दोन लोण देत २४-०७ अशी आघाडी घेणाऱ्या वर्तकनगरने उत्तरार्धात आणखी एक लोण देत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. ओम् वर्तकनगरच्या वैष्णवी साळुंखे, पूजा जाधव, पूर्वा इंगवले यांच्या झंझावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते. अमर हिंदची साईशा पेडणेकर चमकली.














दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com